रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ११४
www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ मंगळवार, ११ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मोठे भोम येथे वयोवृद्ध महिलेचा संशयास्पद मृत्यू/२
मोहिली-निकोप परिसरात पुन्हा बिबट्याची दहशत/५
कबड्डी स्पर्धेत पुणे ग्रामीण, परभणी संघ विजेते/८



# शक्तिशाली स्फोटाने दिल्ली हादरली!

## १२ जणांचा मृत्यू, ३० जखमी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राजधानी दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ हाय सेक्युरिटी झोन असलेल्या भागात एका कारमध्ये शक्तिशाली स्फोट झाल्याची घटना सोमवारी (दि. १०) घडली. या स्फोटानंतर जवळपासच्या गाड्यांनीदेखील पेट घेतला. यामध्ये किमान १२ जणांचा मृत्यू झाला असून ३० जण जखमी झाल्याची महिती मिळत आहे. हे आकडे वाढण्याची शक्यता आहे.


वृत्तानुसार सोमवारी संध्याकाळी ६.३०च्या सुमारास हा भीषण स्फोट झाला. अग्निशमन दलाने दिलेल्या माहितीनुसार लाल किल्ला मेट्रो स्टेशनच्या गेट क्रमांक १जवळ एका कारमध्ये स्फोट झाला. या स्फोटानंतर सुमारे तीन ते चार अन्य वाहनांनाही आग लागली. अग्निशमन दलाने ती विझवली. स्फोटाच्या वेळी परिसरात मोठी गर्दी होती. पोलिसांनी तत्काळ परिसर रिकामा करून लाल किल्ला, मेट्रो स्टेशनच्या आसपास सुरक्षा वाढवली आहे. एनआयए आणि एनएसजी कमांडोदेखील घटनास्थळी दाखल झाले.

स्फोटाचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही. पोलिसांनी संपूर्ण परिसर सील केला असून बॉम्ब स्क्वॉड आणि फॉरेन्सिक टीम घटनास्थळी तपास करत आहेत.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून घटनेचा आढावा घेतला तसेच घटनास्थळी पाहणी व रुग्णालयात जाऊन जखमींची विचारपूस केली, तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी गृहमंत्र्यांकडून माहिती घेत मृतांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

# मुंबईत काँग्रेसचे एकला चलो रे!

## महापालिका निवडणूक स्वबळावर -वडेट्टीवार



**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जोरदार तयारी करत मोर्चेबांधणी सुरू केली आहे. या घडामोडी सुरू असतानाच आगामी मुंबई महापालिकेची निवडणूक काँग्रेस स्वबळावर लढवणार असल्याची माहिती काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. त्यामुळे महाविकास आघाडीत फूट पडली का, असा सवाल राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.

प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेस नेते वडेट्टीवार म्हणाले, आमच्या स्थानिक नेत्यांनी मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे मनसेबरोबर जाण्याचा आता तरी कोणताही विचार किंवा प्रस्ताव नाही हे स्पष्ट आहे. मुंबई महापालिकेची तिजोरी खाली झाली आहे. भ्रष्टाचाराची प्रकरणे खूप असून खिरापत वाटली जात आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या निवडणुकीमध्ये जे आवश्यक प्रश्न आहेत, ते प्रश्न घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जाऊ. **(पान २ वर..)**




# पनवेल महापालिका हद्दीत अधिक सुविधा देणार -आमदार प्रशांत ठाकूर

## कळंबोलीत दैनिक बाजार, खेळाच्या मैदानाचे भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थापन झाल्यापासून अनेक विकासकामे वेगाने सुरू आहेत. सिडकोलादेखील परिसराचा इतका विकास करता आला नाही जितका विकास महापालिकेच्या माध्यमातून झाला आहे. त्यामुळे येणाऱ्या काळातही आपल्याला अधिक ताकदीने काम करून नागरिकांना सुविधा उपलब्ध करून द्यायच्या आहेत, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कळंबोलीमध्ये दैनिक बाजारांच्या भूमिपूजनावेळी केले.



पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यानुसार कळंबोलीमध्ये १४ भूखंडांवर दैनिक बाजार बांधण्यात येणार असून हे काम महापालिकेच्या १५ कोटी ३९ लाख २५ हजार ३१५ रुपयांच्या निधीमधून केले जाणार आहे. त्याचे भूमिपूजन तसेच दोन कोटी ९१ लाख रुपयांच्या निधीमधून बांधण्यात येणाऱ्या खेळाच्या मैदानाच्या कामाचा शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी (दि. १०) झाला.

या कार्यक्रमास माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक रवींद्र भगत, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, जिल्हा चिटणीस रविनाथ पाटील, कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, अशोक मोटे, महाराष्ट्र वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभूदास भोईर, विजय भोईर, सुरेश भोईर, विष्णू गायकवाड, दर्शन पाटील, मच्छिंद्र कुरुंद, दिलीप बिस्ट, अमर ठाकूर, महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, दुर्गा सहानी, गौरी कोरडे, विद्या फरांदे, कविता चव्हाण, लैला चांद पाशा, सुलभा साखरे, गौरव नाईक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये नागरिकांनी जो विश्वास आपल्यावर दाखवला, तोच विश्वास येणाऱ्या महापालिका निवडणुकीमध्येही महायुतीवर दाखवतील, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

# पेण पालिका निवडणुकीसाठी भाजप सज्ज

## इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती



**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी केली आहे. निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती आमदार रविशेठ पाटील यांच्या वैकुंठ निवासस्थानी सोमवारी (दि. १०) घेण्यात आल्या. या वेळी भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील आणि निवडणूक प्रमुख सतीश धारप हेही या वेळी उपस्थित होते.

मुलाखतीदरम्यान इच्छुक उमेदवारांच्या कार्याची, जनाधाराची तसेच त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक योगदानाची सविस्तर पडताळणी करण्यात आली. उमेदवारांनी आपल्या कार्याचा आढावा आणि आगामी निवडणुकीसाठीच्या योजना नेत्यांसमोर मांडल्या.

पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, सर्व उमेदवारांचा सखोल विचार करून योग्य, प्रामाणिक व जनसेवेसाठी तत्पर असणाऱ्यांना उमेदवारी देण्यात येईल.

भाजप हा जनतेच्या विकासासाठी व पारदर्शक प्रशासनासाठी कटिबद्ध असून आगामी नगरपालिका निवडणुकीत पक्ष जनतेच्या विश्वासास पात्र ठरेल, असा विश्वास या वेळी व्यक्त करण्यात आला.

# पनवेल मनपा निवडणुकीसाठी आज आरक्षण सोडत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध प्रवर्गांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी मंगळवारी (दि.११) सकाळी ११ वाजता आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोडत काढण्यात येणार आहे.

या वेळी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) तसेच सर्वसाधारण महिला आरक्षणासाठी सोडत काढण्यात येणार आहे. या सोडतीचे थेट प्रक्षेपण महापालिकेच्या Panvel City Municipal Corporation या फेसबुक पेजवरून करण्यात येणार आहे.

## 🔍 निवडक

### ‘एमसीए’च्या अध्यक्षपदी पुन्हा अजिंक्य नाईक


**मुंबई :** मुंबई क्रिकेट संघटनेचे (एमसीए) विद्यमान अध्यक्ष अजिंक्य नाईक यांचा आपल्या पदावर कायम राहण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ‘एमसीए’च्या १२ नोव्हेंबरला होणाऱ्या त्रैवार्षिक निवडणुकीत अध्यक्षपदासाठी एकूण आठ जणांनी अर्ज दाखल केले होते, मात्र सोमवारी (दि.१०) अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी नाईक वगळता सर्वच उमेदवारांनी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घेतली. त्यामुळे नाईक यांना ‘एमसीए’ अध्यक्ष म्हणून सलग दुसरा कार्यकाळ मिळणार आहे.

### अभिनेते धर्मेंद्र यांची प्रकृती खालावली, उपचार सुरू

**मुंबई :** बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांची तब्येत बिघडल्याने मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. वयोमानानुसार त्यांची प्रकृती खालावल्याचे सांगण्यात येत आहेत. त्यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने आयसीयूत शिफ्ट करण्यात आल्याची माहिती आहे. डॉक्टरांची एक टीम त्यांच्यावर उपचार करीत आहे.

## आजपासून रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धा

# ३०० खेळाडूंचा सहभाग



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडच्या वतीने, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, उलवे नोडच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित योनेक्स-सनराईज वरिष्ठ गट राज्य निवड चाचणी रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धेला मंगळवार (दि.११) पासून सुरुवात होत आहे. ही स्पर्धा पाच दिवस म्हणजे १५ नोव्हेंबरपर्यंत उलवे नोड येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये रंगणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते, तर स्पर्धेचा अंतिम सामना व समारोप समारंभ १५ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजता आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

स्पर्धा पुरुष एकेरी, महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी, मिश्र दुहेरी या गटांमध्ये होणार असून राज्यातील सुमारे ३०० खेळाडू विविध गटांमध्ये सहभागी होतील. विजेते, उपविजेते आणि उपांत्य फेरीतील खेळाडूंना एकूण चार लाखांची रोख बक्षिसे, चषक प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने अंतिम फेरीतील खेळाडूंकरिता अतिरिक्त दीड लाखांचे रोख पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा आणि रोमांचक लढतींचा क्रीडारसिक आणि बॅडमिंटनप्रेमी नागरिकांनी उपस्थित राहून आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बिहारमध्ये आज शेवटच्या टप्प्यातील मतदान; यंत्रणा सज्ज


**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यासाठीचे मतदान मंगळवारी (दि. ११) होणार असून निवडणूक आयोगाकडून मतदानासाठी चोख व्यवस्था करण्यात आली आहे. या टप्प्यात १२२ मतदारसंघामध्ये मतदान प्रक्रिया होईल.

बिहारमध्ये दुसऱ्या टप्प्याच्या मतदानासाठी १२२ मतदारसंघात ४५ हजार मतदान केंद्र उभारण्यात आली आहेत. मंगळवारी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होईल. काही मतदारसंघांमधे सुरक्षेच्या कारणास्तव मतदानाची वेळ संध्याकाळी ५ वाजेपर्यंत असेल. या टप्प्यात एक हजार ३०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून तीन कोटी ७० लाख मतदार या उमेदवारांमधून आपल्या लोकप्रतिनिधीची निवड करणार आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून नेपाळला लागून असलेल्या सीमा तसेच उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि झारखंडला लागून असलेल्या सीमा बंद करण्यात आल्याची माहिती पोलीस महासंचालक विनय कुमार यांनी दिली. भारत-नेपाळ सीमेवरील मैत्री एक्स्प्रेस रेल्वेसेवा निवडणुकीपुरती बंद केल्याचेही त्यांनी सांगितले.



**पनवेल : संत ज्ञानेश्वर महाराज समाधी संजीवन सोहळ्यानिमित्त श्री सद्गुरू वामनबाबा महाराज पायी दिंडीचे शांतीकुटी मठ, तळोजा मजकूर येथून आळंदीकडे प्रस्थान झाले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिंडीत सहभागी होऊन दर्शन घेतले.**

# पारा घसरला! राज्यात थंडीचा कडाका



**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात आता गुलाबी थंडी पडू लागली असून अनेक जिल्ह्यांत हंगामातल्या निचांकी तापमानाची नोंद झाली आहे. सकाळच्या सुमारास धुकंही पहायला मिळत आहे.

पावसाने महाराष्ट्रातून रजा घेतली आहे. त्यानंतर राज्यावर आता गुलाबी थंडीची चादर पसरली आहे. हवामान कोरडे झाले असून उत्तरेकडील थंड हवा महाराष्ट्राकडे आल्याने राज्याच्या किमान तापमनात घट होत आहे. राज्यात अनेक ठिकाणी पारा १४ अंशांच्या खाली घसरल्याने गारठा वाढला आहे.

मुंबईच्या हवेतील आर्द्रता कमी झाली असून गारवा वाढला आहे. कोकणात रायगड जिल्ह्यात थंडीला सुरुवात झाली असून वातावरण आल्हाददायक झाल्याने पर्यटकांच्या संख्येत वाढ होत आहे.

दरम्यान, पारा घसरल्याने ठिकठिकाणी शेकोट्या पेटायला लागल्या असून लोक गुलाबी थंडीचा आनंद घेत आहेत. येत्या काळात राज्यात थंडीचा कडाका आणखी वाढण्याची चिन्हे आहेत. देशाच्या उत्तरेत बर्फवृष्टी होत असल्याने महाराष्ट्रातील हवामानात मोठ्या प्रमाणात बदल होताना दिसून येत आहे.

**धुळे @ ८.५**

धुळे जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला असून सोमवारी (दि. १०) सकाळी ८ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस इतक्या निचांकी तापमानाची नोंद झाली. नाशिक शहरामध्ये तापमानाचा पारा घसरून निफाड येथे ९.५ अंश सेल्सियस तापमान नोंदले गेले. पावसाने पाठ फिरवताच जळगाव जिल्ह्यात थंडीने जोर पकडला असून तेथील तापमान १०.५ इतक्या निचांकी पातळीवर खाली गेले आहे. अमरावती जिल्ह्यात मध्य प्रदेशातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे मेळघाटाचा परिसरही गारठला आहे.

# एमएनएम स्कूलचा माजी विद्यार्थी अक्षय पाटील मर्चंट नेव्हीमध्ये कॅप्टनपदी

## ■ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयाचा माजी विद्यार्थी, न्हावा गावचा सुपुत्र अक्षय विलास पाटील याची मर्चंट नेव्हीमध्ये कॅप्टनपदी नियुक्ती झाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना, येणारा काळ स्पर्धेचा असून विद्यार्थ्यांनी फक्त उत्तीर्ण होण्यापेक्षा अभ्यासासाठी मेहनत आणि परिश्रम घेऊन चांगले गुण मिळवून शाळेचा नावलौकिक वाढवावा, असे सांगितले.

कॅप्टन अक्षय पाटील याने मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनात शिक्षकांकडून मिळालेले ज्ञान, संस्कार तसेच घेतलेल्या कष्टाची आठवण करून देत विद्यार्थ्यांनी प्रचंड मेहनत घेऊन उज्वल यश प्राप्त करावे, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, न्हावा माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र भोईर, अनंताशेठ ठाकूर, वसंतशेठ पाटील, मीनाक्षी पाटील, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, सुधीर ठाकूर, योगिता भगत, सुहास भगत, विश्वनाथ कोळी, निलेश खारकर, श्रीकांत घरत, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलास लेंबे, आर.एस. भोईर, डी.के. म्हात्रे, पर्यवेक्षक प्रणिता गोळे, अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी कॅ. पाटील याचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रस्त्यावरील खड्ड्यांमुळे अपघातग्रस्त झालेल्यांना मिळणार भरपाई!

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील अनेक ठिकाणी पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असून खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच दिलेल्या आदेशानुसार खड्डे किंवा उघड्या मॅनहोल्समुळे झालेल्या अपघातांमध्ये मृत्यू झाल्यास वारसांना सहा लाख रुपये, तर गंभीर दुखापत झाल्यास ५० हजार ते २.५ लाख रुपये इतकी भरपाई संबंधित प्राधिकरणाकडून देण्यात येणार आहे.



भरपाई देण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग ( पीडब्ल्यूडी ), एमएमआरडीए किंवा संबंधित प्राधिकरणांवर राहणार असून ही रक्कम नंतर रस्त्यांच्या देखभालीतील त्रुटींसाठी जबाबदार ठरलेल्या कंत्राटदार किंवा अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात येईल.

**भरपाईसाठी समिती स्थापन**

भरपाईची प्रक्रिया जलद आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भरपाई समिती स्थापन करण्यात आली आहे.या समितीत संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे सदस्य सचिव हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील. समितीकडून आलेल्या अर्जांवर सहा ते आठ आठवड्यांत निर्णय घेण्यात येणार असून दर तीन महिन्यांनी शासनाला प्रगती अहवाल सादर करणे बंधनकारक असेल.

**पोलिसांना ४८ तासांत कळवावे लागणार**

खड्ड्यांमुळे अपघात किंवा मृत्यू झाल्यास संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ४८ तासांच्या आत समितीला कळविणे अनिवार्य असेल. भरपाई देण्यात विलंब झाल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी किंवा विभाग प्रमुख अधिकारी जबाबदार धरले जातील, असा स्पष्ट इशारा उच्च न्यायालयाने दिला आहे.

**व्याजासह भरपाई**

भरपाई रक्कम वेळेत न दिल्यास वार्षिक नऊ टक्के व्याजासह नुकसानभरपाई देणे बंधनकारक राहील. तसेच दोषी ठरलेल्या कंत्राटदारांवर काळ्या यादीत टाकणे, दंड आकारणी आणि फौजदारी कारवाई करण्याचेही आदेश न्यायालयाने दिले आहेत.या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील नागरिकांना खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांमध्ये त्वरित न्याय आणि भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असला, तरी रस्त्यांची देखभाल आणि दर्जा सुधारण्यात प्रशासनाची चालढकल कायम असल्याची नागरिकांची नाराजी व्यक्त होत आहे.

## खोपोलीत वाहतूक कोंडी करणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांची कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील सर्वात जास्त रहदारी असणाऱ्या बाजारपेठ मुख्य रस्त्यावर दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या खोपोलीकरांना भेडसावत आहे, या समस्या कडे खोपोली पोलिसांनी गांभीर्याने पहात अशा तासन्तास बाजारपेठेत वाहने उभी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा बडगा उभारल्याने वाहन चालकांमध्ये खळबळ उडाली आहे. नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे.



बाजारपेठेत दिवसेंदिवस या मुख्य रस्त्यावर नवीन बांधकामे होत असताना रस्त्यासाठी जागा न सोडल्यामुळे त्याच प्रमाणे या रस्त्याच्या दोन्ही बाजूला अनधिकृत बांधकामे दिवसेंदिवस वाढत असल्याने रस्ता लहान होत आहेत याकडे मुख्याधिकारी यांना या समस्या कडे पाहण्यास वेळ नाही असा ग्रामस्थांचा आरोप आहे. या मुख्य रस्त्यावर बाजारपेठ असल्याने अनेक इमारती बँका तसे व्यवसाय कार्यालय असल्याने दिवसभर या रस्त्यावर नागरिकांचे अवागमन होत असते,तसेच वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात असते, पूर्वी एक मार्गी वाहतुकीचा रस्ता करण्यात आला होता परंतु काही दिवस त्याची अंमलबजावणी झाली परंतु, हा प्रयत्न फसल्याचे स्पष्टपणे जाणवते. त्यामुळे वाहतूक कोंडी हा प्रश्न जैसे थे राहिला आहे.

प्रशासनाचे म्हणणे की व्यापारी व नागरिक या सहकार्य करत नाहीत . मुंबई पुणे ठिकाणी नवीन बांधकामे करताना रस्त्यासाठी काही प्रमाणात जागा सोडली जाते परंतु पालिका प्रशासन तांत्रिक मुद्दा उपस्थित करून वेळ मारून नेते असा नागरिकांचा आरोप आहे . खोपोली बाजारपेठेत एक इंच ही जागा रस्त्यासाठी सोडली जात नाही किंबहुना रस्त्यावरच बांधकामे आल्याचे नागरिकांचा आरोप आहे. नवीन इमारती बांधकाम करताना तळघरात पार्किंगसाठी जागा ठेवणे अत्यावश्यक असताना ती जागा पुरेशी सोडली जात नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. मुख्य बाजारपेठ रस्त्यावर फळ व भाजी विक्रेत्यांच्या गाड्यांमुळे सुद्धा वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. रेल्वे कडे जाणाऱ्या दीपक हॉटेल चौकात तर दोन्ही कडून भाजी विक्रेत्या व फळ विक्रेत्यांनी जागा अडवल्यामुळे रस्ता निमुळता होत चालला आहे.

> **रस्त्यावर टासनतास वाहने उभी करणाऱ्या वालचालका विरोधात आम्ही नियमानुसार गुन्हा नोंदवण्याचे काम सुरू केले आहे त्यामुळ वाहतूक कोंडी काही प्रमाणात सुटेल**
> **–सचिन हिरे,**
> **पोलीस निरीक्षक**

## उरण मोठे भोम येथे वयोवृद्ध महिलेचा संशयास्पद मृत्यू

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील मोठे भोम येथील वयोवृद्ध महिला हिराबाई जनार्दन जोशी (९०) हिचा स्वतःचे राहते घरी डोक्याला गंभीर दुखापत झालेल्या व रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह पोलिसांना रविवारी सायंकाळच्या आढळून आल्याने संपूर्ण घटनेमुळे मोठेभोम गावासह चिरनेर परिसर हदरला आहे



मयत महिलेच्या तीन सासुवाशीण मुली असून एक पुतण्या आहे. ती घरात एकटीच राहत होती. डोक्याला गंभीर दुखापत झाल्याचे आढळून आल्याने पोलिसांना संशय अधिक बळावला आहे.रविवार ९ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास आजूबाजूच्या घरात कोणत्याही प्रकारे सुगावा न लागता ही घटना घडली असल्याने आश्यर्य व्यक्त करण्यात येत असून,घरात पडून जखमी होऊन मृत्यू झाल्याची तक्रार महिलेच्या नातेवाईकांनी उरण पोलिस ठाण्यात दाखल केली आहे.या बाबत उरण पोलिसांनी घटनास्थळी मृतदेहाची तपासणी करून मृतदेहाचे शवविच्छेदन करून नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे.नातेवाकांनी महिलेच्या मृतदेहावर अंत्यसंस्कारही केले.

या प्रकरणी उरण पोलिसांनी तातडीने फॉरेन्सिक वॅन बाईकसह मोठेभोम येथे काल १० नोव्हेंबर रोजी महिलेचा मृत्यू नेमका कसा झाला आहे याचा तपाससुरु केला आहे ,उरण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय जोशी,सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्नील केदार,पोलिस उपनिरीक्षक संजय राठोड,पोलिस हवालदार मछिंद्र कोळी यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी अधिक तपास करीत आहेत.

## कळंबोली पोलीस बेपत्ता महिलेच्या शोधात

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

घरातून न सांगता गेलेल्या आईच्या शोधात कळंबोली मधील कुटुंबीय असून चिंतेत सापडले आहेत. याबाबत हरवलेल्या आईच्या मुलीने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे .

या बेपत्ता महिलेचा रंग गोरा असून उंची पाच फूट पाच इंच असून नाक सरळ आहे. चेहरा सरळ व उभट आहे. डावा डोळा तिरळा आहे. लाल रंगाची साडी परिधान केली असून गळ्यात बेन्टेक्स चे मंगळसूत्र आहे या महिलेला हिंदी भाषा अवगत आहे. त्याबाबत कोणास काही माहिती मिळाल्यास त्याची त्वरित माहिती कळंबोली पोलीस ठाण्यास देण्याचे आवाहन पोलीस नाईक गोसावी यांनी केले आहे.

## रूम पार्टनरचा कॅमेरा आणि मोबाईल चोरणारा अटक



**रेवदंडा : रामप्रहर वृत्त**

येसदे ता. मुरुड येथील महावीर वाटिका मध्ये राहणारे फिर्यादी हरिशसिंह यांनी त्यांचे रूममध्ये ठेवलेल्या बॅगमधून कॅनोन कंपनीचा कॅमेरा व ओप्पो कंपनीचा मोबाईल असा सुमारे १,३२,०००/– रु किंमतीचा मुद्देमाल त्यांचाच रूम पार्टनर भरत विनयकुमार वीज रा. दिल्ली हा चोरून दिल्ली येथे पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला रेवदंडा पोलिसांनी मिनिडोअर मधून ताब्यात घेतले आहे.

याबाबत सविस्तर हकीकत अशी की, फिर्यादी हरिशसिंह व आरोपी भरत विज हे दोघेही सिद्धांत हॉटेल येथे नोकरी करीत असताना येसदे येथे रूम पार्टनर म्हणून एकत्र राहत होते. आरोपीने सिद्धांत हॉटेल येथील नोकरी सोडली होती. फिर्यादी हरीशसिंह हे सकाळी सिद्धांत हॉटेल येथे कामावर गेले असता आरोपीत भरत याने त्या संधीचा फायदा घेऊन फिर्यादी यांचे बॅग मधील कॅनोन कंपनीचा कॅमेरा व ओप्पो कंपनीचा मोबाईल असा मुद्देमाल चोरून घेऊन तेथून पळ काढला. आपला रूम पार्टनर अचानक रूम सोडून गेला याबाबत संशय वाटल्याने फिर्यादी हरीश सिंह यांनी त्यांच्या चीजवस्तू तपासून पाहिले असता त्यामध्ये त्यांना त्यांचा कॅमेरा व मोबाईल मिळून न आल्याने त्यांनी तात्काळ रेवदंडा पोलीस ठाणे येथे माहिती दिली. त्यानंतर सपोनी किरवले यांचे सूचना व मार्गदर्शन प्रमाणे पोसई म्हशीलकर, सहाफौ सुर्वे,पोहवा राठोड, पोहवा ठाकूर यांचे पथकाने आरोपी भरत याचा शोध सुरु केला.

आरोपी भरत हा सदरचा मध्यमात घेऊन दिल्ली येथे पळून जाण्याच्या तयारीत असताना तो येसदे येथून मिनिडोर रिक्षा मधून अलिबाग बाजूकडे प्रवास करीत असल्याची माहिती मिळताच रेवदंडा पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून सदरचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती माया मोरे व सहा. पोलीस निरीक्षक किरवले यांचे मार्गदर्शनानुसार सहा.फौ. सुर्वे तपास करीत आहेत.

## किहीम येथे पक्षी निरीक्षण अभ्यास कार्यशाळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यभरात सध्या पक्षी सप्ताह साजरा केला जात आहे. या निमित्ताने रायगड जिल्ह्यातील किहीम येथे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या वतीने पक्षी निरिक्षण अभ्यास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात २० हून अधिक पक्षीनिरीक्षक आणि अभ्यासकांनी सहभाग नोंदविला. महत्वाची बाब म्हणजे अनेक दुर्मिळ स्थलांतरीत पक्षांचा अधिवास आढळून आला.



महाराष्ट्रभरात दिनांक ५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर या काळात पक्षीसंवर्धन आणि जनजागृती करण्यासाठी दरवर्षी पाक्षीसप्ताह राबवण्यात येतो. अरण्यऋक्षी मारुती चितमपल्ली (५ नोव्हेंबर) आणि पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सालिम अली (१२ नोव्हेंबर) यांच्या जन्मदिनाच्या मधल्या काळात हा पक्षीसप्ताह महाराष्ट्रात राबवण्यात येत असतो. अलिबाग येथील किहीम येथे या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

जगविख्यात पक्षी शास्त्रज्ञ डॉ. सालिम अली याचे कार्य सर्वसामान्यांनं पर्यंत पोहचवण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम हाथी घेण्यात आहेते आहे. त्याचाच एक भाग म्हणून आणि पक्षीसप्ताह निमित्ताने किहीम पर्यटन गाव पक्षीओळख आणि पक्षीशास्त्र या विषया वर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते, ही कार्यशाळा बीएनएचएसचे संचालक किशोर रिठे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकमान्य शिक्षण प्रसारक मंडळ उच्च महाविद्यालयात पार पडली. या कार्यशाळेच्या अंतर्गत नंदकिशोर दूध आणि रोहन चव्हाण मार्गदर्शन केले. या कार्यशाळेला प्राचार्य लीना पाटील व पक्षीमित्र प्रदीप कवळे यांनी सुद्धा आपली उपस्थिती दर्शवली.

दरम्यान, पक्षी निरीक्षण मोहीमेतयामध्ये किहीमच्या समुद्रसपाटी वरील पक्षांचे निरीक्षण करण्यात आले त्यामध्ये हिवाळ्यामध्ये स्थलांतर करून येणाऱ्या पक्ष्यांच्या नोंदी घेण्यात आल्या, त्यामध्ये, रंगीत तुतारी, सामान्य तुतारी, सामान्य टिलवा, कैटीश चिखल्या, छोटा चिखल्या मोठा चिखल्या, या पक्ष्यांचा अधिवास आढळून आला. यामध्ये एका पक्षाच्या पायात फ्लॅग आणि रिंग सुद्धा आढळून आली

## पोलादपूर येथे उद्या काळभैरवनाथ जयंती उत्सव

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर नगरिचे ग्रामदैवत श्रीदेव काळभैरवनाथ यांचा जयंती उत्सव बुधवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी देवस्थानामध्ये साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त भाविकांनी सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे देवस्थानचे अध्यक्ष बाबुराव महाडिक यांनी केले आहे.

बुधवारी सकाळी ७ ते ८ वाजता देवाचा अभिषेक ८ ते ९ वाजता होम हवन ९ ते १० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा सकाळी ११ ते १२ वाजता महाआरती, दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत उद्योजक मधुकर विष्णू जाधव व परिवारातर्फे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सायंकाळी ७ वाजता देवाची आरती होणार आहे तर रात्री १० ते ११.३० वाजेपर्यंत पोलादपूर बाजारपेठेमधील आदिशक्ती महिला भजनी मंडळातर्फे भजनाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

**पान १ वरुन**

## मुंबईत काँग्रेसचे एकला चलो रे!

मुंबईत काँग्रेस पक्षाची ताकद वाढवण्यासाठी आणि पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांना ताकद देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे वडेट्टीवार यांनी सांगितले तसेच हायकमांडबरोबर चर्चा झाल्यानंतरच पक्षाच्या स्थानिक नेत्यांना त्या संदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार दिला आहे आणि आमच्या लोकांनीदेखील तेच ठरवले असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे नेते भाई जगताप यांनी, मुंबई महापालिका निवडणुकीत आम्ही राज ठाकरे तर सोडाच, पण उद्धव ठाकरे यांच्याबरोबरही निवडणूक लढवणार नाही. मी जेव्हा मुंबई काँग्रेसचा अध्यक्ष होतो तेव्हाही ही गोष्ट 'डंके की चोट' पर सांगितल्याचे म्हटले होते. त्यानंतर आता वडेट्टीवार यांनीही स्वबळाचा नारा दिल्याने महाविकास आघाडीत फूट पडणार असल्याची चर्चा आहे.

## 'पद्मदुर्गचे पुरातत्व विभागाने संवर्धन करावे'



**मुरुड : प्रतिनिधी**

समुद्रावर ज्याची सत्ता त्याची जगावर सत्ता हे समीकरण द्रष्ट्या जाणत्या राजाने आरमाराचे महत्व जाणले होते. म्हणूनच जंजिऱ्या च्या उरावर दुसरी दंडा राजपुरी पदमदुर्गाच्या रुपाने छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारली होती . ऐतिहासिक दृष्टया पदमदुर्ग चे महत्व खुप जास्त आहे . त्यामुळे या किल्ल्याचे विभागाने संवर्धन करावे असे आवाहन इतिहास अभ्यासक तथा रायगड स्मारक समितीचे कार्यवाह सुधीर थोरात यांनी केले .

मुरुड येथील हिंदु एज्युकेशन सोसायटी येथे आयोजित शिव शंभु विचार मंच तर्फे आयोजित गडप्रेमी व गड संवर्धक संघटनांच्या पदाधिकाऱ्यां च्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बोलत होते .आपल्या भाषणात त्यांनी रायगड किल्ल्याचा १६७४ च्या राज्यभिषेक सोहळ्या पासुन चा इतिहास कथन करत रायगड राजधानीचे महत्व विशद करताना

छत्रपती शिवरायांनी स्वकर्तृत्वाने हिंदवी स्वराजाची स्थापना रायगडावरच केली . राज्यभिषेक सोहळा झाल्यामुळे च ते छत्रपती झाले . आणि महाराजांनी शेवटचा श्वास इथेच घेतला आणि अनंतात विलीन झाले . या मुळे रायगडाचे महत्व अनन्य साधारण आहे .

यावेळी शिवशंभु मंचचे ॲड . रमेश मोरे, विद्याधर गायकर, अमित गाडगीळ, दिलीप जोशी , संजय ठाकूर, अनिकेत पाटील, अमित पाटील , रुपेश जामकर, आशिष बुल्लु आदी मान्यवर उपस्थित होते.

पदम दुर्ग किल्ल्यावर पर्यटकांची संख्या वाढु शकते त्यासाठी जेट्टीची व्यवस्था करण्यात यावी तसेच पदम दुर्ग चे संवर्धन व्हावे यासाठी स्थानिक गड किल्ले संवर्धन मंडळ व शिवप्रेमींची बैठक आयोजित करण्यात येईल अशी माहिती देण्यात आली.

## प्रगतशील महाराष्ट्र प्रदर्शनामध्ये महानिर्मितीला सर्वोत्कृष्ट दालन पुरस्कार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

जळगाव येथे दिनांक ३ नोव्हेंबर ते ५ नोव्हेंबर या कालावधीमध्ये खासदार स्मिता उदय वाघ यांचे संकल्पनेतून भरविण्यात आलेल्या प्रगतशील महाराष्ट्र २०२५ या भव्य प्रदर्शनामध्ये महानिर्मिती दालनाला ऊर्जा विभाग अंतर्गत सर्वोत्तम दालन पुरस्कार प्राप्त झाला. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या उपक्रमातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना जनतेपर्यंत पोचविण्याच्या दृष्टिकोनातून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांचे हस्ते महानिर्मितीला सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार संजय भोळे तसेच स्थानिक जेष्ठ लोकप्रतिनिधी उपस्थित होते. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राधाकृष्णन बी. (भा. प्र.से.) यांचे निर्देशानुसार तसेच संचालक (संचलन) संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे आणि संचालक (वित्त) मनेष वाघीरकर तसेच कार्यकारी संचालक. डॉ. नितीन वाघ यांचे मार्गदर्शनानुसार प्रदर्शित करण्यात आलेल्या या दालनाला बारा हजारपेक्षा अधिक संख्येने युवक, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच नागरिक यांनी भेट दिली.

महानिर्मिती शाश्वत हरित ऊर्जेकडे या संकल्पनेवर आधारित हे दालन उभारण्यात आले होते.अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेला ६६० मेगावॅट क्षमतेचा औष्णिक प्रकल्प व अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामध्ये महानिर्मितीतर्फे उभारण्यात आलेले आणि नियोजित प्रकल्प याबाबत माहिती या दालनाच्या माध्यमातून देण्यात आली होती.



# आकुर्ली ते नेरे रस्त्याची दयनीय अवस्था

## स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांकडून सिडकोकडे पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आकुर्ली ते नेरे रस्त्याची सध्या दयनीय अवस्था झाली असून ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे प्रवाशांना, वाहन चालकांना त्रासदायक ठरत आहेत. संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर हे खड्डे बुजवावेत आणि रस्ता चांगला करावा यासंदर्भात भाजप पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुनील पाटील आणि विश्वजीत पाटील यांच्याकडून पाठपुरावा सुरू आहे.





येथील रस्त्यावर चिपळे, बोनशेत, कोप्रोली गावाजवळ मोठमोठे खड्डे पडले आहेत. पनवेल-माथेरान रोड परिसरात जाण्या येण्यासाठी मोठ्या प्रमाणात वर्दळ आणि वाहतूक होत आहे. दररोज मोठ्या प्रमाणात स्कुल व्हॅन, बसेस, रिक्षा, दुचाकी, कारने प्रवासी प्रवास करत असतात. या खड्ड्यांमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. या खड्ड्यांमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी देखील होत आहे. आकुर्ली जवळदेखील एक मोठा खड्डा पडला आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे जीवित हानी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. चिपळे, बोनशेत, भोकरपाडा जवळ मोठमोठे खड्डे पडले आहेत.

नागरिकांची खड्ड्यातून प्रवास करताना त्रेधातीरपीट उडत आहे. खड्ड्यांमुळे अनेक अपघात देखील झाले आहेत, मात्र प्रशासनाला त्याचे काही सुयार सुतक नाही. खड्ड्यांमुळे वाहनांचे नुकसान होत आहे. तसेच प्रवास करतानादेखील उशीर होत आहे. या खड्ड्यातून प्रवास करताना नागरिक आणि प्रवासी प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करीत आहेत. येथील खड्डे लवकरात लवकर बुजवावेत अशी मागणी सुनील पाटील आणि विश्वजीत पाटील यांनी केली आहे.

दरम्यान, सिडको प्रशासनाकडून हे खड्डे लवकर भरून देण्यात येतील व समोर खराब झालेला रस्ता लवकरात लवकर पूर्ण करण्यात यईल, अशी माहिती सिडकोच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# अनधिकृत पार्किंगला लागणार चाप

## पनवेलमध्ये अनेक महिन्यानंतर टोईंग व्हॅन पुन्हा सुरू

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल शहर व नवीन पनवेल परिसरात अनेक महिने बंद असलेल्या टोईंग व्हॅन गेल्या काही दिवसांपासून पुन्हा रस्त्यावर सुरू झाले आहे.

टोईंग व्हॅनवरील कर्मचारी आणि वाहतूक पोलिसांबाबत तक्रारी आल्याने यंत्रणा तात्पुरती बंद करण्यात आली होती. पनवेल व नवीन पनवेल परिसरात टोईंग व्हॅन यंत्रणा बंद असल्याने रस्तोरस्ती नियमबाह्यपणे वाहने उभी करण्यात येत आहेत. त्याला आळा घालण्यासाठी वाहतूक शाखेने पुन्हा टोईंग व्हॅन सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाहतूक शाखेने सम-विषम पार्किंग, बेशिस्त पार्किंग यावर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे नागरिकांनी रस्त्यावर वाहने पार्क करताना ती योग्य ती ठिकाणी पार्क करावी असे आवाहन वाहतूक शाखेने केली आहे. तसेच शाळा, हॉस्पिटल तसेच मार्केट परिसरात वाहने पार्क करू नयेत जेणेकरून इतरांना त्रास होईल असे पार्किंग करू नये अशी मागणी केली आहे.

या वेळी वाहतूक पोलिसांनी व्हॅनवर उद्घोषक बसवण्यात आल्याचे सांगितले. कारवाई दरम्यान उद्घोषक वरून नागरिकांना चुकीच्या ठिकाणी असलेले पार्किंगमधील वाहने काढण्याचे आवाहन करण्यात येत आहे. या वेळी वाहनचालकांनी नागरिकांना सेवेऐवजी त्रासच अधिक होतो, शिवाय दुजाभाव होतो. हे बदल करून कारवाई पारदर्शकता असावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## निवडक

### टाकीची तोडफोड व सामानाची चोरी

**पनवेल :** पाण्याच्या टाकीची तोडफोड करून तेथील वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी प्रणव गडकरी (रा. चिखले) याच्याविरोधात तालुका पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला. चिखले येथील पाण्याच्या टाकीची तोडफोड करून प्रणव याने येथील पाण्याची मोटार, पाईप आणि इतर वस्तू अशा प्रकारे ५० हजारांपेक्षा जास्त किमतीचा ऐवज चोरुन नेला होता, या घटनेची माहिती सरपंच, ग्रामसेवक यांना मिळाल्यानंतर त्यांनी हे साहित्य प्रणव याने ज्या भंगारवाल्याला विकले होते त्याच्या कडून हे साहित्य त्यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी तालुका पोलीस ठाण्यात प्रणव गडकरीवर गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील इसराईल मजिद जवळ मातोश्री निवास येथे पार्क करून ठेवलेली मोटरसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. विद्या सुभाष भोईर यांनी त्यांच्या मालकीची १५ हजार रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची होंडा ॲक्टिव्हा (एमएच ४६ ओएन ११९१) हि शहरातील इसराईल मजिद जवळ मातोश्री निवास येथे पार्क करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने ती चोरून नेली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### ट्रकमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** तालुक्यातील पळस्पे फाटा येथे पार्क केलेल्या ट्रकमधून अज्ञात चोरट्याने २६० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. ट्रकचालक राम राऊत हा त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच ०१ ईई ३६८३) हा पळस्पे फाटा येथे पार्क करून झोपला असतांना कोणीतरी अज्ञात चोरट्याने ट्रकमधून सुमारे २३ हजार रुपये किमतीचा २६० लिटर डिझेल चोरून नेला. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्याकडून खेळाडूंना प्रोत्साहन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चंद्रकांत स्मृती श्री कृष्ण स्पोर्ट्स नागझरी यांच्या आयोजनातून आणि भाजपचे युवा नेते महेश पाटील यांच्या वाढदिस्वनिमित्त आमदार चषक २०२५ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन नागझरी येथील मैदानात करण्यात आले आहे. या स्पर्धेला भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी सोमवारी भेट देऊन उत्कृष्ट आयोजनाबद्दल आयोजकांचे कौतुक केले तसेच खेळाडूंना प्रोत्साहित केले.

ही स्पर्धा ६ ते ११ नोव्हेंबरदरम्यान रंगणार असून स्पर्धेतली प्रथम क्रमांकास एक लाख ५० हजार, द्वितीय क्रमांक ७५ हजार तसेच तृतीय, चतुर्थ आणि पाचव्या क्रमांकासह ३५ हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात येणार आहेत. या वेळी भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा नेते महेश पाटील, युवा मोर्च्याचे पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील आदी उपस्थित होते.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर चाकूहल्ला

**पनवेल : वार्ताहर**

परपुरुषासोबत संबंध असल्याच्या संशयावरून पतीने पत्नीवर चाकूने वार करून तिला जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात या पतीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जखमी महिलाच्या पतीला दारू व गांजाचे व्यसन आहे. त्यातून त्यांच्यात नेहमी वाद होत होते. तिचा पती घरी आल्यानंतर त्याने तिचे परपुरुषासोबत संबंध असल्याचे बोलत तिच्या छाती व डाव्या हातावर चाकूने वार करून तिला जखमी करुन तेथून पलायन केले. या हल्ल्यात जखमी झालेल्या पत्नीला पनवेल येथील एक रुग्णालयात उपचारार्थ दाखव करण्यात आले असून ते तिच्यावर उपचार सुरू आहे. या प्रकरणी नवऱ्यावर गुन्हा दाखल करून करण्यात आला असून त्याचा शोध सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# बियर शॉपमध्ये चोरी; गुन्हा दाखल

**पनवेल :** दोन अनोळखी इसमांनी बियर शॉपचा छताचा सीमेंटचा पत्र आणि सिलिंग तोडून बिअर शॉप मध्ये प्रवेश करत तेथून २१ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संजू बडेकर (रा. पाले खुर्द, चौक) यांनी बेगम शेख (भिंगारवाडी) त्याच्याकडून शेख बियर शॉपी भाड्याने चालवण्यास घेतले आहे. त्याच्या या दुकानात अज्ञात चोरट्याने दुकानाच्या छताचे पत्रे तोडून या दुकानात प्रवेश केला. त्यानतर त्याने दुकानात ठेवलेली २० हजार रुपयंची रोकड, मोबाईल चार्जर आणि बियरचे कॅन चोरून तेथून पसार झाला. या प्रकरणी संजू बडेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा नोंद करून त्याचा शोध सुरु केला आहे.

# लोकशाही दिनी पाच अर्ज निकाली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय लोकशाही दिन कोकण भवनमध्ये अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) फरोग मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली झाला. नागरिकांनी तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. प्रलंबित आठ अर्जांपैकी पाच अर्ज निकाली काढण्यात आले असून तीन अर्जांवर कोकण विभागीय स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या आठ असून आज आलेल्या अर्जांची संख्या शून्य आहे, असे एकूण प्राप्त अर्ज आठ होते. त्यापैकी ०५ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. सध्या कोंकण विभागीय स्तरावर तीन अर्ज प्रलंबित आहेत, अशी माहिती कोकण विभागीय आयुक्त कार्यालयाने दिली आहे.

# पनवेलमध्ये आजपासून आरोग्य सेवा शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका वैद्यकीय आरोग्य विभाग यांच्या सहकार्याने आयुष्मान भारत जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत आरोग्य सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांना दरवर्षी पाच लाखांपर्यंतच्या आरोग्य सेवांचा लाभ या योजनेतून मिळू शकतो.

हे शिबिर ११ ते १३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत भरविण्यात येणार आहे. ३५६ समेळ निवास, मिरची गल्ली नाका, महात्मा गांधी रस्ता, पनवेल हे शिबिराचे ठिकाण आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधार कार्ड या आवश्यक कागदपत्रांसह व आधार कार्डशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक उपस्थित राहावे.

अधिक माहितीसाठी ८५९१८१६६११ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिराचे आयोजन माजी नगरसेविका तथा भाजपच्या महिला मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रूचिता लोंढे यांनी केले आहे.

# थंडीने वातावरण गारेगार!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या दोन दिवसांपासून मोठ्या प्रमाणात हवेत धुके व गारवा जाणवत आहे. गुलाबी थंडी पडत असल्याने लोकांनी स्वेटर, कानटोपी, मौजे इत्यादी उबदार कपडे बाहेर काढले आहेत.

नागरिक, विद्यार्थी आवर्जून घराबाहेर पडत असून गुलाबी थंडीत व्यायाम, खेळ यांचा आनंदही घेत आहेत.

**पनवेल : भाजपच्या पनवेल तालुका उत्तर मंडळाच्या चिटणीसपदी जयदास तेलवणे यांची नियुक्ती करण्यात आली असून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी पनवेल तालुका उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, गोपीनाथ पाटील आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**





**पनवेल : भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू यांची कन्या वैष्णवी कडू हिने फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून ती कमर्शियल पायलट बनली आहे. याबद्दल पनवेल तालुका पत्रकार विकास मंचच्या वतीने सोमवारी वैष्णवीचा विषेश सत्कार करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी माजी नगरसेवक सुनील बहिरा, पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रवीण मोहोकर, दत्ता कुलकर्णी, दीपक घोसाळकर, राजू गाडे आदी उपस्थित होते.**

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेत सुधारणा

## मंत्री अतुल सावे यांच्यासह राज्य सरकारचे अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेत राज्य शासनाने नुकतीच सुधारणा केली आहे. याबाबत पनवेल येथील रोहित बाळासाहेब पैलवान यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सहकार्याने राज्याचे इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे यांच्याकडे पाठपुरावा केला होता.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेप्रमाणे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठीही मंजूर अभ्यासक्रमामध्ये कोणत्याही वर्गात किंवा कोणत्याही वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज करून योजनेचा लाभ घेण्याची मुभा देण्यात यावी, अशी मागणी रोहित पैलवान यांनी केली होती. ते सध्या दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या वनशास्त्र महाविद्यालयात पदव्युत्तर पदवीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहेत. त्यांनी या संदर्भात मंत्री अतुल सावे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश आले आहे.

यासाठी रोहित पैलवान यांनी मंत्री सावे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी नानासाहेब कदम यांना पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या शिफारशीने निवेदन दिले होते. त्याचप्रमाणे इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच सहकारी अरबाज पठाण व राज वेताळ यांचेही पैलवान यांना सहकार्य लाभले. योजनेत सुधारणा केल्याबद्दल राज्य सरकार व यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले आहेत.

दरम्यान, या निर्णयाचा लाभ बारावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या महाराष्ट्रातील तमाम ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी प्रवर्गातील गरीब विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेमध्ये मिळणार आहे.

# गव्हाण विद्यालयास लोकनेते दि.बा. पाटील यांची प्रतिमा भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मधील सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील तथा एच.आर.पाटील यांनी वाढदिवसानिमित्त आपले मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि स्थानिक प्रकल्पग्रस्तांचे झुंजार लढवैय्ये नेते स्वर्गीय माजी खासदार लोकनेते दि.बा. पाटील यांची प्रतिमा विद्यालयास सप्रेम भेट दिली.

वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांनी विद्यालयास दि.बां.ची प्रतिमा विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांचेकडे सुपूर्द केली.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे आणि इतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी हर्षला पाटील यांना तसेच परीक्षा विभागाचे सहायक प्रशांत परदेशी यांना वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.







**पनवेल : स्व. अभि प्रतिष्ठान-संग्राम ११ क्रिकेट संघ, नितळसच्या वतीने मा.सरपंच आणि उपसरपंच चषकचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. दरम्यान, युवा कार्यकर्ते रोशन पाटील याला वाढदिवसानिमित्त अरुणशेठ भगत व उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, तोंडरेचे माजी सरपंच राम पाटील, युवा नेते महेश पाटील, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, अशोक साळुंखे, जिल्हा ओबीसी मोर्चा सरचिटणीस यतिन पाटील आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# लोकशाहीचा उत्सव सुरू

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना 'मिनी विधानसभा' असे म्हटले जाते. लोकशाहीत जनतेचे प्रतिनिधित्व सर्वोपरि समजले जाते. लोकांनी लोकांसाठी चालवलेले लोकांचे राज्य अशीच लोकशाहीची व्याख्या आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर जनतेच्या समस्यांची तड लागावी अशी अपेक्षा असते. ही प्रक्रिया आता पुन्हा सुरू होईल. हे निश्चितच निरोगी लोकशाहीचे लक्षण आहे. या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सोमवारी सुरूवात झाली.**

महाराष्ट्रातल्या गेली अनेक वर्षे रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा महाउत्सव आता खऱ्या अर्थाने सुरु झाला आहे. २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठीच्या या निवडणुका २ डिसेंबरला पार पडतील. या सर्व ठिकाणी गेली काही वर्षे निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या. त्यामुळे लोकशाहीचे चक्र काहिसे थंडावले होते. सुदैवाने राज्यात महायुतीचे जबाबदार सरकार सत्तेवर असल्यामुळे सामान्यजनांची कामे बऱ्यापैकी होत राहिली. अन्यथा विचित्र परिस्थिती उद्भवली असती. सध्या बहुतेक राजकीय पक्षांच्या कार्यालयांमध्ये इच्छुकांची गर्दी दिसते आहे. याला कुठलाच पक्ष अपवाद नाही. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा गट), शिवसेना (शिंदे गट) या सत्ताधारी पक्षांसह महत्त्वाच्या विरोधीपक्षांच्या कार्यालयांतही उडालेली इच्छुक उमेदवारांची झुंबड हे सशक्त लोकशाहीचेच चित्र आहे हे नाकारता येणार नाही. मध्यंतरीच्या काळात काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी तथाकथित पुराव्यांसकट निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि मनसेने अशाच प्रकारचे आरोप करत मोर्चा काढला. परंतु या वातावरणनिर्मितीचा कसलाच परिणाम जनमानसावर झालेला नाही हे इच्छुकांच्या गर्दीवरून सहज लक्षात येईल. निवडणुका जाहीर झाल्या की अशाप्रकारचे वारेमाप आरोप होतातच. विरोधकांकडे एकही मुद्दा न उरल्यामुळे अखेर थेट निवडणूक आयोगालाच संशयाच्या घेऱ्यात आणून स्वत:चा पराभव झाकण्याची पाळी काँग्रेस आणि त्यांच्या बगलबच्च्यांवर आली आहे. काहीही केले तरी भारतीय जनता पक्षाचा नि:पात करणे आपल्या आवाक्यात नाही याची जाणीव विरोधीपक्षांच्या नेत्यांना झाली असणार. मतचोरी आणि भ्रष्टाचाराचे आरोप सतत होत असले तरी महायुतीच्या कुठल्याच पक्षाला गळती लागल्याचे चिन्ह नाही. याचाच अर्थ विरोधकांच्या आरोपांच्या चिखलफेकीवर जनतेचा किंचितही विश्वास बसलेला नाही. लोकसभेच्या वेळीही 'संविधान खतरे में' अशा आरोळ्या ठोकून विरोधकांनी राळ उठवली होती. त्याचा काही अंशी फटका तेव्हा महायुतीला बसला हे मान्य करावे लागेल. परंतु महाराष्ट्राची जनता सुज्ञ असल्यामुळे विधानसभेच्या वेळी मात्र विरोधकांचे फेक नॅरेटिव्ह चालू शकले नाही. येत्या स्थानिक निवडणुकांमध्येही विरोधक निष्प्रभ ठरतील हे सांगायला कुण्या भविष्यवेत्त्याची गरज नाही. सध्याचे राजकीय चित्र बघितल्यास असे दिसते की बहुतेक पक्ष स्वबळाचे नारे देत आहेत. यास मुंबई महापालिका देखील अपवाद नाही. महापालिकांच्या निवडणुका अजुन जाहीरही झालेल्या नाहीत. त्या पुढल्या टप्प्यात पार पडतील. पण मनोमिलनाच्या बाता करणारे पक्षही स्वबळाचीच भाषा सध्यातरी करत आहेत. आपल्याकडे असलेले कार्यकर्ते ऐनवेळी फुटू नयेत म्हणून ही काळजी घेतली जात असावी. एव्हाना मनोमिलन, हातमिळवणी, मैत्रीपूर्ण लढती कशा होणार याची गणिते तयार झाली असतील. तथापि ही रणनीती आताच उघड करणे कुठल्याच पक्षाला परवडणार नाही. स्थानिक निवडणुका या पक्षाच्या चिन्हावर लढल्या जात असल्या तरी त्यामध्ये स्थानिक गणिते अधिक महत्त्वाची ठरतात. त्याचे प्रतिबिंब येत्या तीन तारखेला निकालात दिसेलच.

# मुलांना हवे मानसिक स्वातंत्र्य!



महिला व बालविकास विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने बालकांच्या मानसिक, शारीरिक आणि कौटुंबिक आरोग्याची काळजी घेण्यासाठी राज्यातील अंगणवाड्यामंध्ये पालक मेळावा आयोजित करण्यात येतो. याचा सकारात्मक परिणाम होताना दिसतो. आरंभ या कार्यक्रमाच्या तीन मुख्य व्यासपीठांपैकी एक म्हणजे पालक मेळावा. घरभेटी आणि मातामंडळ बैठकांबरोबरच पालक मेळाव्याचा उद्देश म्हणजे संपूर्ण समुदायाने एकत्र शिकणे आणि मुलांच्या संगोपनाबद्दल आई बरोबर वडील आणि कुटुंबातील सदस्यांनी जागरूक होणे आवश्यक आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना राबवल्या जातात. याप्रमाणे युनिसेफ ही संयुक्त राष्ट्रसंघाची एक संस्था आहे जी मुले आणि मातांची कल्याणासाठी काम करते. तिचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे, जगभरातील मुलांना अन्न, आरोग्य सेवा, शिक्षण आणि संरक्षण उपलब्ध करून देणे, आपत्ती, युद्ध किंवा दारिद्र्यग्रस्त भागातील मुलांना मदत करणे, लसीकरण, स्वच्छ पाणी आणि शिक्षणाच्या कार्यक्रमांद्वारे मुलांचे जीवन सुधारणे यासाठी १९४६ साली दुसऱ्या महायुद्धानंतर युद्धग्रस्त देशांतील मुलांना मदत करण्यासाठी ही संस्था स्थापन करण्यात आली.

लहान मुलांना खेळ, संवाद आणि सुरक्षित वातावरणापासून ते त्यांच्या आहारापर्यंत माहिती सांगणारे स्टॉल्स, खेळणी, शारीरिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींबद्दल माहिती देण्याचे काम अंगणवाडी कर्मचारी, आरोग्य, आशा ताई करत आहेत. प्रत्येक बालकाच्या उत्तम वाढीसाठी पहिले हजार दिवस सुवर्णमयी असतात. त्यात पालक, घरातील सदस्याचा सहभाग अत्यावश्यक असतो. त्यामुळे पालकांशी मनमोकळा संवाद साधण्यासाठी महिला व बालविकास विभाग युनिसेफच्या समन्वयाने आईबरोबर वडिलांनीही बालकाला सांभाळण्याची जबाबदारी घ्यावी; याचबरोबर घरातील सदस्यांचीही तेवढीच जबाबदारी असल्याचे प्रबोधन या पालक मेळाव्याच्या माध्यमातून करण्यात येते.

अनेकदा मी मुलांना काहीही करण्यापासून रोखते, त्यांना ओरडते. त्यामुळे मुले तात्पुरती गप्प बसतात. पण पालक मेळाव्याच्या माध्यमातून हे समजले की मुलांना कायम नकारात्मक प्रतिक्रिया देऊन त्यांच्या वाढीवर परिणाम होतो. त्यांना त्यांच्या पद्धतीने गोष्टी करू दिल्या तर त्यांची बौद्धिक वाढ उत्तम होते. अशी प्रतिक्रिया अंगणवाडीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकाने दिली.

या मेळाव्याच्या माध्यमातून मुलांच्या विकासात सुधारणा, कुटुंब आणि समुदाय सशक्त करणे, बाल संगोपनाबद्दल समुदाय जागरूकता वाढवणे, अंगणवाडी आणि आशा ताईंची भूमिका अधिक बळकट करणे, समग्र बालकांच्या काळजीबाबत दृष्टीकोन तयार करणे, समुदायाचा सहभाग आणि आत्मविश्वास वाढविणे, सातत्याने टिकणाऱ्या बालकांच्या पद्धतींचा प्रसार करण्याचे काम करण्यात येते.

या मेळाव्यात दोन वर्षे वयोगटापर्यंत मुलांसाठी वयोगटानुसार खेळणी आणि शैक्षणिक साहित्य दाखवले जाते, दोऱ्यांचे जुने पुंजके, साबणाचे बॉक्स, कागदी डबे या वापरलेल्या वस्तूंपासून तयार केलेल्या खेळांच्या माध्यमातून मुलांच्या पाचही इंद्रियांचा विकास करणे हा उद्देश होय. दोऱ्यांचे वापरलेले रिळ, टाकून दिलेली झाकणे, पुठ्ठा, बांगड्या, साबणाचे रिकामे कागदी डब्बे यापासून बनवलेली तोरणं, माळा, रंगीत खेळणी मुलांना मेळाव्यात खिळवून ठेवतात. खेळणाऱ्या मुलांबरोबर त्यांची आई आणि इतर पालकांचाही समावेश होतो. काही खेळ हे पालकांसाठी असतात.


या मेळाव्याच्या माध्यमातून बालकांशी संवाद साधण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. मुलांना विविध मुखवटे व टोपी घालून त्यांना आरशासमोर उभे केले जाते. जेणेकरून त्यांना स्वत:चा चेहरा पाहता येतो. अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून संवाद वाढवणे, मेंदूचा विकास, सामाजिक आणि भावनिक वाढ होण्यास मदत होते. मुलाचा मेंदू पहिल्या १००० दिवसांत सर्वाधिक वाढते म्हणून या काळात स्पर्श, संवाद आणि खेळ यावर भर दिला जातो. पालक मेळाव्यात मुलांसाठी बाहूली घर तयार केले जाते. यामध्ये कल्पनाशक्तीचा वापर करून खेळ खेळवले जातात. यामुळे त्यांच्या सामाजिक, भावनिक आणि बौद्धिक विकासाला चालना मिळते. पौष्टिक पोषण अंतर्गत सहा महिन्यांपर्यंत आणि त्यानंतरचे अन्न कसे असावे हे दाखवले जाते तसेच जंक फुडचे दुष्परिणाम आणि स्थानिक फळभाज्यांचा उपयोग सांगितला जातो.

याचबरोबर आरोग्याची जनजागृती कार्यक्रमात लसीकरणाचे वेळापत्रक, स्वच्छता, आयर्न-फॉलिक सिडचे महत्व, निमिया प्रतिबंध इत्यादी माहिती देण्यात येते.पालक हेच मुलांचे पहिले शिक्षक असतात, तीन वर्षांच्या वयातील विकास हा आयुष्यभरासाठीचा पाया घालतो. मुलांशी संवाद, प्रेम आणि संधी दिल्यास त्यांचा मेंदू, लक्ष आणि स्मरणशक्ती जलद वाढते. प्रोत्साहन हेच सर्वात मोठे शिक्षण आहे.

**-श्रद्धा मेश्राम, विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय**

# लावणीला उजाळा देणारे लोककवी पठ्ठे बापूराव

पठ्ठे बापूरावांचे नांव श्रीधर कृष्ण कुलकर्णी रेठरेकर. त्यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८६८ रोजी हरणाक्ष रेठरे (वाळवा तालुका, सांगली जिल्हा) या गावी झाला. लहानपणापासून श्रीधरला तमाशाचा नाद होता. त्यांची घरची परिस्थिती जेमतेम होती. आई-वडिलांनी श्रीधरला शाळेत घातले. त्याचवेळी त्याला कविता करण्याचा छंद लागला व त्याचा गळाही गाता राहिला. ग्रामीण भागात गायल्या जाणाऱ्या जात्यावरच्या ओव्या ऐकूनऐकून त्यांनी त्यांतही बदल केले. त्यांनाही श्रीधरची गाणी अशी लोकप्रियता मिळाली. श्रीधरच्या शिक्षकांनी शिफारस करून त्याचे नाव औंध सरकारांना कळविले. त्याची दखल घेऊन औंधच्या राजांनी श्रीधरला आपल्याकडे बोलावून घेतले. श्रीधरचे पुढील शिक्षण औंध येथे झाले. पुढे त्याच्या १६व्या वर्षी राणीसाहेबांनी श्रीधरला बडोद्यास नेले. तेथे तो संस्कृत भाषा शिकला. त्याबरोबरच त्याने कलाभुवन या संस्थेत यंत्र दुरुस्तीचे शिक्षणही घेतले व नोकरीही केली. दुर्दैवाने श्रीधर अवघ्या सतरा वर्षे वयाचा असताना त्याचे आई-वडील निवर्तले. शेवटी बडोद्याची नोकरी सोडून श्रीधर परत आला.



गावी घरासमोर असलेल्या वाड्यातच तमाशाचा फड चालायचा. श्रीधरच्या कानावर त्या वाड्यातल्या तमाशाचे सूर येत, पण ब्राह्मण आणि कुलकर्णीपद, त्यामुळे रात्री पटकन उठून तमाशाला जाऊन बसायचे धाडस त्यांना होईना. मनातली तळमळही त्यांना गप्प बसू देईना. बापू चोरून तमाशाला जाऊ लागले. तमासगिरांना त्यांनी अनेक लावण्या लिहून दिल्या. तमाशात बापूरावाच्या लावण्या आणि कवने गायली जाऊ लागली. बापूराव घराबाहेर पडले. गावोगावी तमाशाचा फड उभे राहू लागले. बापूरावांचे स्वतः चे काव्य, योग्य साथ, पहाडी आवाज आणि लावणीतील शृंगाराने तमाशा बदलला. त्यातून श्रीधरची वाहवा होता होता पठ्ठेबापूराव म्हणून ते प्रसिद्धीला आले. एकेकाळचा तमाशा सम्राटाला अखेरचे दिवस विपन्नावस्थेत कंठावे लागले. त्यांच्याच तमाशात काम करणाऱ्या ऋताई परिंचेकर या बाईने त्यांना शेवटपर्यंत सांभाळले. याच काळात पुण्यातील बापूसाहेब जिंतीकर यांनी बापूरावांना आधार दिला. त्यातूनच या जिंतीकरांनी बापूरावांच्या कवनांचे संकलन केले. १९४२ साली बापूरावांचा श्रीमंत आबासाहेबांच्या हस्ते जॉन स्मॉल मेमोरियल पुणे येथे जाहीर सत्कार झाला. या श्रेष्ठ कवीने २२ डिसेंबर १९४५ रोजी आपली इहलोकीची यात्रा संपविली. हा शाहीर सांगली जिल्ह्याचे भूषण होता. आजही रात धुंदीत जागवा म्हणत त्यांची कवने गात शाहीर रात्री जागवितात. (साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# हिरो एक्सट्रीम १२५ आरचा नवीन टॉप-स्पेक लाँच

हिरो मोटोकॉर्पने ७ नोव्हेंबर रोजी हिरो एक्सट्रीम १२५आर चा एक नवीन टॉप-स्पेक प्रकार लाँच केला. यामुळे ही भारतातील पहिली १२५ सीसी बाईक बनली आहे, ज्यामध्ये ड्युअल-चॅनेल एबीएस आहे. या स्पोर्टी बाईकमध्ये क्रूझ कंट्रोल, कलर टीएफटी डिस्प्ले आणि तीन रायडिंग मोड्स सारखी वैशिष्ट्ये देखील आहेत.त्याची किंमत १०४,५०० (एक्स-शोरूम, दिल्ली) ठेवण्यात आली आहे, ब्रेक लावताना घसरण्याची भीती नाही.



ड्युअल-चॅनेल एबीएस पुढील आणि मागील दोन्ही चाकांवर ब्रेकिंग नियंत्रित करते. यामुळे स्किडिंगचा धोका कमी होतो. हीरो म्हणते की हे वैशिष्ट्य तरुण रायडर्ससाठी परिपूर्ण आहे, ज्यांना वेग आणि सुरक्षितता दोन्ही हवे आहेत.


हिरो एक्सट्रीम १२५आर चा नवीन टॉप व्हेरिएंट तीन नवीन रंग पर्यायांमध्ये सादर करण्यात आला आहे: ब्लॅक पर्ल रेड, ब्लॅक मॅटशॉ ग्रे आणि ब्लॅक लीफ ग्रीन. बाईकमध्ये आता नवीन ग्राफिक्स आहेत, जे अधिक प्रीमियम फील देतात. टँक एक्सटेन्शन अधिक शार्प आहे. अँगुलर साइड पॅनल्स, हाय-सेट टेल सेक्शन आणि टायर हगर बाईकला स्पोर्टी लूक देतात.

कामगिरी: ५.९ सेकंदात ०-६० किमी प्रतितास वेग आणि ६६ किमी प्रति लिटर मायलेज

याव्यतिरिक्त, बाईकची एकूण रचना आक्रमक आणि मस्क्युलर आहे. यामध्ये एलईडी हेडलाइट, मस्क्युलर टँक आणि अपस्वेप्ट एक्झॉस्टचा समावेश आहे. बसण्याची जागा आरामदायी आहे, ज्यामुळे ती शहरी रायडिंगसाठी योग्य बनते. १३६ किलो वजनामुळे हाताळणी सोपी होते.

वैशिष्ट्ये: पूर्ण एलईडी लाइटिंग सेटअप आणि डिजिटल इन्स्ट्रुमेंट कन्सोल. हेडलाइट युनिट आणि पूर्ण LED लाइटिंग सेटअप आहे. बाईकमध्ये स्प्लिट पिलियन ग्रॅब रेल देखील आहेत. यात ब्लूटूथ कनेक्टिव्हिटीसह ४.२-इंचाचा रंगीत TFT LCD डिस्प्ले आहे, जो डिजिटल स्पीडोमीटर, इंधन गेज, ट्रिप मीटर, टर्न-बाय-टर्न नेव्हिगेशन, कॉल आणि एसएमएस अलर्ट आणि संगीत नियंत्रणे यासारख्या वैशिष्ट्यांसह येतो.

# समाजसुधारक राजारामशास्त्री भागवत



## निमित्त

राजारामशास्त्री भागवत हे प्रख्यात विद्वान आणि समाजसुधारक होते. भाषाशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र व्युत्पत्ती, इतिहाससंशोधन, धर्मसुधारणा, वेद-पुराणे, स्मृती वगैरेंची चिकित्सा इ. ज्ञानाच्या क्षेत्रांमधील मोठे प्रज्ञावंत होते. यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८५१ रोजी कशेळी (ता. राजापूर जि. रत्नागिरी) येथील भिक्षुकी करणाऱ्या कर्हाडे ब्राह्मण कुटुंबात झाला.

१८३०च्या सुमारास इंग्रजी शिक्षणार्थ त्यांचे वडील रामकृष्ण हरी व चुलते भास्कर हरी हे दोघे मुंबईस आले. पुढे रामकृष्ण हरी यांनी मुंबई नगरपालिकेत नोकरी केली. राजारामशास्त्री यांची आई ते लहान असतानाच वारली. वडील वेदान्त विषयाचे भोक्ते होते. सर्वसामान्यांना वेदान्त समजावा म्हणून रामकृष्णपंतांनी सायुज्यसदन (१८६८) आणि कायाजीचा संवाद अशी नाटके लिहिली होती. राजारामशास्त्री १८६७ साली मॅट्रिक झाले.

वडिलांच्या इच्छेनुसार त्यांचे ग्रँट मेडिकल कॉलेजात तीन वर्षे शिक्षण झाले. नंतर वडिलांच्या मृत्यूमुळे हे शिक्षण थांबले. एका संस्कृत पंडिताकडे अध्ययन करुन ते शास्त्री झाले. नंतर रॉबर्ट मनी हायस्कूलमध्ये १८७५ साली ते शिक्षक झाले. नंतर ते सेंट झेव्हिअर कॉलेजात संस्कृतचे प्राध्यापक म्हणून शेवटपर्यंत होते. १९०२ साली मुंबई विद्यापीठात 'विल्सन फायलॉलॉजिकल'लेक्चरर म्हणून त्यांची निवड झाली. शिक्षणविषयक स्वतंत्र ध्येये असल्यामुळे त्यांनी १८८४ साली बाँबे हायस्कूल व पुढे स्वालंबनाने मराठा हायस्कूल काढले. महर्षी कर्वे, रँ. परांजपे, बॅ, जयकर वगैरे अनेक नामवंत त्यांचे विद्यार्थी होते. भागवत लोकशिक्षक होते. पाश्चात्त्य व पौर्वात्य विविध भाषांचा सखोल अभ्यास शक्य व्हावा म्हणून लॅटिन, ग्रीक, अरबी, फार्सी वगैरे भाषा ते शिकले.

मुंबईमधील सर्वदेशीय वातावरणाचाही त्यांच्यावर परिणाम झाला. विधवाविवाह वगैरे प्रश्नांवर सुरुवातीस त्यांची मते जुनी होती. नंतर मात्र ती पालटली. अस्पृश्यता निवारणाकडेही त्यांनी सक्रिय लक्ष दिले. हिंदू धर्माची शास्त्रबोवांनी जी निस्पृह व निर्भीड समीक्षा केली होती तिच्यासंबंधी डॉ. आंबेडकरांनीही त्यांची प्रशंसा केलेली आहे. १९०० नंतर प्रथम बडोदे व पुढे कोल्हापूर येथे वेदोक्त प्रकरण गाजले. मराठे क्षत्रिय आहेत असे शास्त्राधारयुक्त मत व्यक्त करून राजारामशास्त्री यांनी शाहू महाराजांचा पक्ष घेतला. मराठा मुलांची उपनयने चालू व्हावीत म्हणून कोल्हापूर-बेळगाव येथे जाऊन स्वतः त्यांनी पौरोहित्य केले. त्यांना गायत्री मंत्र दिला.

दीनबंधु ह्या सत्यशोधक मुखपत्रात जीवनाच्या अखेरपर्यंत त्यांनी अनेक वादळी लेख लिहिले. लोकहितवादींच्या धारदार शतपत्रांत त्यांनी भरच घातली. स्त्रियांची सुधारणा व सुशिक्षण यासंबंधानेही शास्त्रीबोवांनी प्रयत्न केले. राजारामशास्त्री यांना एकुलती एक मुलगी होती ती १८९७ साली वारली. संस्कृतचे विद्वान असूनही त्यांना मराठी बोलभाषेचा विलक्षण अभिमान होता. मुंबई येथे ४ जानेवारी १९०८ रोजी राजारामशास्त्रींचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# नारळ पाणी पिण्याचे शरीरावर होणारे परिणाम

भारतात सर्वत्र नारळ मिळतात. देशात मोठ्या प्रमाणावर लोक नारळ पाण्याचे सेवन करतात. नारळ पाणी फक्त चवीलाच गोड नसते, तर त्यामुळे अनेक फायदेही मिळतात. कमी कॅलरीज आणि कमी फॅट फूल आहार म्हणून नारळ पाण्याचे सेवन केले जाते. कोणीही आजारी असल्यास या व्यक्तीला पाहण्यासाठी लोक नारळ पाणी घेऊन जातात.



शरीरातील पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी किंवा कोणत्याही आजारासाठी डॉक्टर नेहमी नारळ पाणी पिण्याचा सल्ला देतात. नारळाच्या पाण्याने शरीराला अनेक फायदे मिळतात. सध्या हिवाळ्याचे दिवस सुरू आहेत. थंडीच्या या दिवसांमध्ये बहुतेक लोकांना स्कीनशी संबंधित अनेक समस्यांचा सामना करावा लागतो, अशावेळी या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी नारळ पाणी फायदेशीर ठरते, पण नारळाचे पाणी दररोज प्यायल्याने शरीरावर कोणते परिणाम होतात तुम्हाला माहिती आहे का? याच प्रश्नाचे उत्तर गुरुग्राम नारायण हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ मोहिनी डोंगरे यांनी दिले आहे.

आहारतज्ज्ञांनी सांगितल्यानुसार नारळ पाणी पिणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. नारळाच्या पाण्यात इलेक्ट्रोलाइट्स, लॉरिक सिड, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि झिंक भरपूर प्रमाणात असते, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. नारळाच्या पाण्यात पोटॅशियम असते, जे कॅलरीज कमी करण्यास मदत करते. नारळ पाणी प्यायल्याने रक्तदाब नियंत्रणात राहतो, कारण त्यात पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित ठेवते. त्याचप्रमाणे रक्तातील कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास आणि हृदयाचे आरोग्य चांगले राखण्यास नारळ पाणी मदत करते. याव्यतिरिक्त थकवा किंवा तणाव जाणवत असेल तर नारळ पाणी प्यायल्याने रिलॅक्स वाटते.

नारळ पाणी प्यायल्याने शरीराला अनेक फायदे आहेत, परंतु हे पौष्टिक पेय असले तरी संयम महत्वाचा आहे, कारण जास्त प्रमाणात नारळाचे पाणी सेवन केल्याने कॅलरी आणि साखरेचे प्रमाण वाढू शकते, ज्यामुळे वजन व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो. शरीरात नारळाच्या पाण्याचे प्रमाण जास्त वाढले, तर पोटाच्या समस्येने ग्रस्त लोकांना अतिसाराची समस्या उद्भवू शकते. नारळाच्या पाणी जास्त प्रमाणात सेवन केल्याने एखाद्या व्यक्तीमध्ये हायपरक्लेमिया (पोटॅशियम टॉक्सिसिटी) होऊ शकतो. त्यामुळे आहारतज्ज्ञ म्हणतात, आहारात कोणताही बदल करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्या!

## भाजप तालुकाध्यक्ष अमित घाग यांच्या प्रयत्नाने
# धाटाव एमआयडीसीतील खड्डे भरण्यास सुरुवात

**धाटाव : प्रतिनिधी**

धाटाव एमआयडीसी परिसरातील मुख्य रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून निर्माण झालेल्या खोल खड्ड्यांमुळे नागरिक, वाहतूकदार, तसेच शाळा–कॉलेज विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या रस्त्यावरून रोजच्या रोज हजारो वाहने ये–जा करत असल्याने अपघाताचा धोका वाढला होता. हा रस्ता अनेक गावांना जोडणारा महत्वाचा आणि रहदारीचा मुख्य मार्ग असून, परिसरात बँका, शाळा, कॉलेजेस तसेच धाटाव पोलीस ठाणे असल्यामुळे प्रवाशांचा मोठा वावर असतो. त्यामुळे या खड्ड्यांमुळे वाहतूक विस्कळीत होऊन सर्वसामान्यांना मोठा त्रास होत होता.



या परिस्थितीची दखल घेऊन भाजपाचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी तात्काळ एमआयडीसी प्रशासनाशी संपर्क साधून दुरुस्तीचे निर्देश दिले. त्यांच्या सूचनेनुसार एमआयडीसीचे अधिकारी विनीत कांदळगावकर यांनी ठेकेदाराला बोलावून तत्काळ काम हाती घेतले.सदर कामात खडी टाकून डांबर घालण्यात आले तसेच रोलर फिरवून रस्ता पूर्णपणे समतल आणि सुस्थितीत करण्यात आला. आता या मार्गावरून वाहतूक सुरळीत सुरू असून नागरिक, वाहतूकदार आणि विद्यार्थ्यांनी या तातडीच्या कारवाईचे मनापासून कौतुक केले आहे.


# मोहिली-निकोप परिसरात पुन्हा बिबट्याची दहशत

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ जवळील मोहिली–निकोप परिसरात पुन्हा एकदा बिबट्याच्या दर्शनाने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.रविवार रात्री अकराच्या सुमारास निकोप गावातील एक युवक दुचाकीवरून घरी जात असताना रस्त्याच्या कडेला जंगलाच्या भागात बिबट्या बसलेला दिसला. दुचाकीच्या हेडलाईटचा प्रकाश बिबट्यावर पडताच तो झट्क्यात जंगलात अदृश्य झाला.

सदर घटनेची माहिती तत्काळ वनविभागाला देण्यात आली. काही वेळातच मोहिली, निकोप आणि मानिवली गावचे ग्रामस्थ तसेच वन अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. रात्रीच जंगलात शोधमोहीम राबविण्यात आली; मात्र घनदाट उंच गवत आणि अंधारामुळे बिबट्याचा ठावठिकाणा लागला नाही.

सकाळी पुन्हा फॉरेस्ट विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल होऊन तपासणी केली. ग्रामस्थांसह त्यांनी जंगलात पाहणी केली असता



प्राण्याच्या पायाचे ठसे स्पष्टपणे दिसून आले, ज्यावरून तो बिबट्याच असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या ठिकाणी शोधमोहीम सुरू असून बिबट्याचा वावर निश्चित करण्यासाठी कॅमेरे बसविण्याची तयारी वनविभागाने सुरू केली आहे.वन विभागाने परिसरातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून, लहान मुलांना खेळण्यासाठी बाहेर न पाठविणे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# माणगाव निळगुण ते आळंदी पायी दिंडी; वारकऱ्यांसह भाविकांचा सहभाग

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील निळगुण या भूमीतून दरवर्षी निघणाऱ्या अध्यात्म, श्रद्धा आणि भक्ति भावनेच्या संगमातून उभ्या राहिलेल्या गुरुवर्य तात्यासाहेब बाळासाहेब वासकर महाराज संप्रदायाच्या पायी दिंडी यात्रेला यंदा देखील उत्साहात सुरुवात झाली.

निळगुण ते देवाची आळंदी या पायी दिंडी यात्रेला सोमवार, ९ नोव्हेंबर ते रविवार, १६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत प्रारंभ झाला असून, या यात्रेला रायगड आणि पुणे जिल्ह्यातील भाविकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे. या दिंडीचे प्रस्थान सकाळी ८ वाजता राम बाबू गुगले यांच्या निवासस्थानावरून मंडळींच्या कीर्तन, अभंग आणि हरिनामाच्या गजरात निघाले. या यात्रेचा मार्ग माणगाव–पुणे महामार्गावरील विविध गावांमधून



ताम्हिणी घाट पार करत, कोंडेथर गावाजवळून पुणे जिल्ह्याच्या सीमेत प्रवेश करणारा आहे.

या पायी दिंडीत सामाजिक कार्यकर्ते पंकज तांबे यांनी विशेष सहभाग घेतला. रायगड जिल्ह्याच्या सीमेवर या भाविकांशी संवाद साधत त्यांनी सर्व वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले, भक्ती ही आपल्या समाजाची शक्ती आहे. अशी सामूहिक दिंडी ही केवळ अध्यात्मिक नाही, तर समाजात एकात्मता आणि परस्पर सहकार्याची भावना निर्माण करणारी आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे भाविकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. यात्रेदरम्यान मार्गातील गावांमध्ये भाविकांचे स्वागत फुलांच्या हारांनी, आरतीने आणि प्रसाद वितरणाने करण्यात आले. अनेक ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांनी भाविकांसाठी भोजन, निवारा आणि वैद्यकीय मदतीची व्यवस्था केली आहे

## नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी रविवारी (दि.९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २९८ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली. विविध वाहतुकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून दोन लाख ८६ हजार ४५० रुपये इतका दंड आकारला आहे.

# अधिवक्ता परिषदेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी ॲड. धनंजय धारप

**नागोठणे : बातमीदार**

अधिवक्ता परिषद, रायगड व पनवेल वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल येथे ८ नोव्हेंबर रोजी झालेल्या रायगड जिल्हा अधिवक्ता कार्यशाळेमध्ये रोहा व पाली येथील न्यायालयात सुमारे २५ वर्षे यशस्वी प्रॅक्टीस करणारे विधीज्ञ आणि अधिवक्ता परिषदेच्या रोहा शाखेचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप यांची अधिवक्ता परिषदेच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे शनिवार दिनांक ८ नोव्हेंबर रोजी झालेल्या या कार्यशाळेला प्रमुख पाहुणे म्हणून माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महाराष्ट्र गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष व विद्यमान सदस्य ॲड. पारिजात पांडे, जळगाव येथील ज्येष्ठ विधिज्ञ सुशील अत्रे, अधिवक्ता परिषदेचे कोकण प्रांत अध्यक्ष, मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ विधीज्ञ संजीव गोरवाडकर अधिवक्ता परिषदेचे कोकण प्रांत पालक ॲड. दीपक गायकवाड, अधिवक्ता परिषदेचे रायगड जिल्हा अध्यक्ष व जिल्हा सरकारी वकील ॲड. संतोष पवार, अधिवक्ता परिषदेचे कोकण प्रांत सचिव ॲड. श्रीराम ठोसर, अधिवक्ता परिषद कोकण प्रांत सचिव ॲड. रेखा कांबळे, पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, अधिवक्ता परिषद पनवेलचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र देशमुख, अधिवक्ता परिषद रायगडचे सचिव ॲड. सुनील तेलगे, भाजपाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल वकील संघटनेचे सचिव ॲड. प्रल्हाद खोपकर आदींसह उपस्थित होते.

# माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या हस्ते सुकुम, लाडघरेंना नियुक्तीपत्र

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील पाणसई विभाग राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी कालवण गावचे पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते गणेश सुकुम यांची तर निजामपूर विभागीय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उपाध्यक्षपदी रमेश लाडघरे यांची नियुक्ती पक्ष नेतृत्वाच्या आदेशाने करण्यात आली असून या दोघांना माजी आ.अनिकेत तटकरे यांच्याहस्ते रविवार दि. ९ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री कालवण येथील काळभैरव मंदिराजवळ झालेल्या कार्यक्रमात नियुक्तीपत्र देण्यात येऊन त्यांना उपस्थितीत सर्व मान्यवरांनी पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





सदरचा कार्यक्रम पक्षाचे निजामपूर विभागीय अध्यक्ष तुकाराम सुतार यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास पक्षाचे जेष्ठ नेते शेखरशेट देशमुख,सुदाम थिटेकोकण विभाग प्रवक्ते अँड.राजीव साबळे,प्रदेश युवक सचिव दिपक जाधव,तालुकाध्यक्ष काका नवगणे,बाबूशेठ खानविलकर,उदय अधिकारी,शुक्रदास मोरे,रमेश मोरे,मिलिंद फोंडके,प्रसाद गुरव,संतोष लाड,उद्धव जाधव,शैलेश खांडसकर,शिवाजी घाग,सहादेव बक्कम,विरेश येरुणकर,मधुकर उतेकर,संजोग मानकर,सयाजी मोरे,नितीन जाधव आदींसह पाणसई व निजामपूर विभागातील पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


**प्रदीप शेट्ये प्रा.लि.,**
**पत्ता:** सोगावे, पो.मापगाव
ता. अलिबाग जि. रायगड
सर्वे क्र. ३६, सोगाव, मापगाव, ता. अलिबाग जि. रायगड ही जागा प्रदीप शेट्ये ह्यांच्या मालकीची आहे.सदर जागेचा विकास करावयाचा असून त्याकरता सदर जागेबाबत मा.कामगार आयुक्त मुंबई, महाराष्ट्र राज्य यांचेकडून कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावयाचे आहे.त्या अनुषंघाने सर्वे कामगारांना सूचित करण्यात येते कि, उक्त नमूद केलेल्या जागेशी निगडीत कोणत्याही कामगारांच काही कायदेशीर देणी प्रालंबित असतील तर त्यांनी मा.कामगार उप आयुक्त रायगड यांचे कार्यालय किंवा आमच्या खाली नमूद केलेल्या पत्त्यावर योग्य कागदपत्रासह १५ दिवसाच्या आत संपर्क साधून निराकरण करून घ्यावे.विहित वेळेत जर कोणीही संपर्क साधला नाही तर वरील जागेशी संबंधित कोणाही कामगारांची कायदेशीर देणी शिल्लक नाही असे गृहीत धरण्यात येईल ह्याची नोंद घ्यावी
**पत्ता: कामगार आयुक्त कार्यालय,**
विघ्नहर्ता कॉम्प्लेक्स, सेक्टर १, खांदा कॉलोनी,ओल्ड मुंबई पुणे रोड,
न्यू पनवेल - ४१०२०६



महावितरण

## ई निविदा जाहिर सुचना

खालील कामांकरीता नामांकित आणि पंजीकृत ठेकेदारांकडून ई–निविदा बोलाविण्यांत येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | कामाचा तपशिल | निविदा रक्कम/ निविदा अनामत/ निविदा मुल्य | निविदा विक्री/ खरेदी दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | का अ/पनवेल/ ग्रा./तां./ निविदा क्र.०८/२०२५–२६ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत प्रतिबंधातमक देखभाल व उच्चदाब वाहिनी उपरि तार विद्युत वाहिनी व भुमिगत केबल दुरूस्त व देखभाल करणेबाबतचा ठेका. | रू. ५०.०० लाख रू. ५०,०००/– रू. ११८०/– | दि.१२.११.२०२५ ते दि. २०.११.२०२५ पर्यंत |
| २ | का अ/पनवेल/ ग्रा./तां./निविदा ०९/२०२५–२६ | पनवेल ग्रा. विभागाअंतर्गत प्रतिबंधातमक देखभाल व लघुदाब वाहिनी उपरि तार विद्युत वाहिनी व भुमिगत केबल दुरूस्त व देखभाल करणेबाबतचा ठेका. | रू. ५०.०० लाख रू. ५०,०००/– रू. ११८०/– | दि.१२.११.२०२५ ते दि. २०.११.२०२५ पर्यंत |

अधिक माहिती साठी कार्यकारी अधियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल ग्रामीण विभाग, भिंगारी, पनवेल, जि. रायगड यांच्याशी संपर्क साधावा. संपर्क अधिकारी श्री. दिपक र. चव्हाण मो. नं. ९०२९१६२७८१

**कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या.पनवेल (ग्रा) विभाग**


# खोपोलीत वैष्णवांच्या मेळ्याचे स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

संतांनी दिलेला अध्यात्मिक वारसा कोकणात आजही मजबूत आहे.शनिवारी दि. १५ रोजी आळंदी येथे माऊलीच्या समाधी दिना निमित्ताने समस्त वैष्णवांचा मेळावा भरणार आहे. प्रती वर्षाप्रमाणे या वर्षीही यात कोकणातील वारकरीही मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत..

खालापूर तालुक्यातील प्रमुख दिंड्यांच्या माध्यमातून दहा हजाराच्यावर वारकरी समाविष्ठ आहेत. खोपोलीच्या दिशेने आलेल्या सर्व दिंड्या व वारकरींचे स्वागत व त्यांच्या सेवेत येथील विविध राजकीय व सामाजीक संस्थांनी कोणतीही कसर ठेवली नाही. खोपोली नगरपरिषदेच्या वतीने शिळफाटा येथे वारकरी दिंड्यांचे मनोभावे स्वागत करण्यात येत आहे. सर्व क्षेत्रातील मान्यवरांच्या माध्यमातून दिंड्यांचे मनोभावे स्वागत केले जात आहे. महाराजा मंगलकार्यालय, वरची खोपोली भगवान वीरेश्वर देवस्थान मित्र मंडळ, वासरंग , लौजी , चिंचवली येथील वारकरी संप्रदायाचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते,खोपोली व्यापारी असोशीयशन, भानवज येथील शंकरमंदिर देवस्थान कमिटी, गगनगिरी मित्र मंडळ इत्यादींच्या पुढाकाराने समस्त वारकरयांना चहा नाश्ता, खाण्यापिण्याची, मुक्कामाची व आवश्यक सुविधासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत.

या दोन – तीन दिवसांत खोपोलीला मुक्काम घेऊन एक एक दिंडी हरिनामाचा गजर करीत अवघा संसार ,करावा सुखाचा हा संदेश देत घाट माथ्यावरून माउलीच्या समाधीच्या दर्शनाच्या अनोख्या उर्जेने वाटचाल करीत आहेत.

मागील तीन दिवस खोपोलीकडे येणाऱ्या रस्त्यांवर, खोपोली शहरात सर्वत्र वारकरी संप्रदायाची भगवी पताका,टाळ मुर्दुगाच्या ठेक्यावर हरिनामाचा गजर व तुकोबा, न्यानबा माउलीचा जयजयकाराचे अत्यंत उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.




## ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय कुंभिवली

तालुका–खालापूर, जिल्हा–रायगड
ई–मेल : gpkumbhivali2019@gmail.com मो.नं. ८५५२८५५२३९

### निविदा जाहिरात

आपणास कळविण्यात येते की, खालील प्रमाणे कामांसाठी नोंदणीकृत अभियंता / व्यावसाईक पुरवठा दार यांचे कडून सिलबंद निविदा / वार्षिक दर करार मागविण्यात आहेत. तरी अधिकृत ठेकेदाराने दिनांक ११/११ / २०२५ ते १८/११/२०२५ रोजी दुपा. २.०० वा. पर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा १९/११/२०२५ रोजी दुपारी ११.०० वाजता उघडण्यात येतील. त्यावेळी उपस्थित रहावे कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजूर अथवा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकिय क्कम | इसारा रक्कम १% | सुरक्षा अनामत ५% | निविदा किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रा.पं. अंतर्गत मौ. विरगाव येथील हिरामण वीर ते घनश्याम वीर यांच्या घरापर्यंत असलेल्या अंतर्गत रस्त्याचे काँक्रीट करणे. | ग्रा.निधी २५–२६ | ३०००००/– | ३०००/– | १५०००/– | २००/– |
| २ | ग्रा.पं. अंतर्गत मौ.धामणी/धारावी येथील पाण्याची विहीर येथे पाण्याचा काँक्रीट नाला करणे. | १५वा वित्त २५–२६ | २४७०००/– | २४७०/– | १२२५०/– | २००/– |
| ३ | ग्रा.पं. अंतर्गत मौ.विरगाव अंतर्गत बंदिस्त गटार बांधणे. | १५वा वित्त २५–२६ | ५०००००/– | ५०००/– | २५०००/– | २००/– |
| ४ | ग्रा.पं. अंतर्गत मौ. विरगाव अंतर्गत रस्ता करणे. | १५वा वित्त २५–२६ | ३०००००/– | ३०००/– | १५०००/– | २००/– |
| ५ | ग्रा.पं.कुंभिवली अंतर्गत मौ. कुंभिवली अंतर्गत रस्ता करणे. | १५वा वित्त २५–२६ | ७०००००/– | ७०००/– | ३५०००/– | २००/– |
| ६ | ग्रा.पं.कुंभिवली अंतर्गत मौ.धामणी येथील अंतर्गत रस्ता करणे | १५वा वित्त २५–२६ | ३०००००/– | ३०००/– | १५०००/– | २००/– |
| ७ | ग्रा.पं.कुंभिवली अंतर्गत मौ.धामणी येथील प्रवीण म्हाप्रलकर यांच्या घराकडून येणारा होळी माळाचा कडेचा रस्ता करणे. | १५वा वित्त २५–२६ | ३३६३३०/– | ३३६३/– | १६८१६/– | २००/– |

**टीप :–**
१) निविदा फॉर्म १७/११/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.
२) कामाचे अंदाजपत्रक व नकाशा, वस्तू यादी दि.११/११/२०२५ ते १८/११/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यालयात पहायला मिळतील.
३) कामे व त्यांची बिले उपलब्ध निधी नुसार दिली जातील.
**निविदेंच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे.**
१) सदर सर्व निवडींची प्रक्रिया ग्रामपंचायत मार्फत केली जातील. सदर निविदा नोटीस सूचना, शुद्धीपत्रक, इत्यादी माहिती ग्रामपंचायत नोटीस बोर्ड वर उपलब्ध आहे
२) निविदेसोबत ग्रामपंचायत कुंभिवली या नावाने १% रकमेचा डी.डी. किंवा बँक खाते क्र.०३४०१०१००००००४८ वर भरून त्याची सामान्य पावती जोडणे आवश्यक आहे.
३) निविदा नाकारणे अथवा स्वीकारणे अधिकार कोणतेही कारण न देता रद्द कण्याचे अधिकार प्रसिद्धी धारकाने राखून ठेवला आहे.
४) काम दिलेल्या कालावधीत पूर्ण करणे बंधनकारक असेल तसे न झाल्यास दंडात्मक कारवाई होईल.
५) PAN कार्ड GST नोंदणी प्रत, INCOME TAX प्रत कार्यालयात सादर करावी.
७) ५०० रु च्या बाँड वर प्रतिज्ञा पत्र सदर करावे.
तालुक्यातील व नोंदणीकृत स्थानिक ठेकेदारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. वरील सर्व अटी शर्ती या विकास कामासाठी आहेत. (लायसन्स द्वारे करावयाच्या कामाची मर्यादा ओलांडली नसल्याबाबत दाखले)
८) कामाच्या साहित्याचे नमुने प्रयोग शाळेतून तपासून घ्यावेत व त्यांच्या अहवालाची प्रत ग्रामपंचायतीस सादर करावी.

दिनांक : १०/११/२०२५
जा.क्र. ग्रु.ग्रा.पं. कुंभिवली/ / २०२५

**स्वाक्षरी/–**
**(विश्वास शिला नवनाथ वारे)**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली

**स्वाक्षरी/–**
**(सौ. रेखा घनश्याम वीर)**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत कुंभिवली



## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६
**वैद्यकीय आरोग्य विभाग**

कार्यालय : देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल–४१०२०६.
दुरध्वनी क्र. : ०२२–२७४५८०४०/४१/४२. फॅक्स नं. : ०२२–२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५५७५१ उपायुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९
Email Id : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.५८१/६०२/२०२५ दिनांक : १०/११/२०२५

### जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुत्रपिंड आजाराने ग्रस्त असलेल्या नागरिकांना पालिकेमार्फत मोफत डायलॅसीस सेवा उपलब्ध करुन देणेकामी पालिकेने खारघर व नवीन पनवेल येथे ०२ डायलॅसीस युनिट (प्रत्येकी २५ खाटांचे) सेंटर कार्यान्वित करण्यात येणार आहे. या डायलॅसिस युनिटमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना Liquid Oxygen, Medical Oxygen, Medical Nitrous oxide इत्यादी मेडिकल गॅसची आवश्यकता भासणार आहे. याकरिता गॅस पुरवठा करणेकामी कंत्राटी तत्वावर एजन्सीची नेमणुक करण्यात येणार आहे. याकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यासाठी खालील नमुद केलेल्या बाबींकरिता बाजारभाव दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नाव | मुदत |
|---|---|---|
| १ | Supply of Refilled Medical Gas Cylinders for PMC Dialysis Center on Contract basis. | **११.११.२०२५ ते १८.११.२०२५ दुपारी ३.०० वाजेपर्यंत** |

सविस्तर जाहीर सुचना पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट www.panvelmunicipalcorporation.com या वेबसाईट वरती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**सही/–**
**(प्रसेनजीत कारलेकर)**
उपायुक्त (वैद्यकीय)
पनवेल महानगरपालिका

# नेरूळ रेल्वेस्थानकात बेवारस वाहने पडून

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईत पार्किंगच्या विषयाने नागरिक व प्रशासन त्रासलेले आहे. त्यात शहरात अनेक वाहने रस्त्यावर धूळ खात पडलेली असताना रेल्वे स्थानकांबाहेर असलेले सिडकोचे वाहनतळ देखील यातून सुटलेले नसल्याचे दिसून येत आहेत. नवी मुंबईत अनेक ठिकाणी पालिकेच्या जागेवर वाहने पार्क केली जात असल्याचे चित्र नवी मुंबईत दिसत असतानाच सिडकोचे वाहनतळ अर्ध्याधिक बेवारस वाहनांनी व्यापलेले पाहण्यास मिळत आहे. या वाहनांचा व त्यांच्या नंबर प्लेटचा गुन्ह्यासाठी दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नवी मुंबई पोलिसांनी सिडको सोबत मोहीम राबवत नवी मुंबईसह नेरुळ रेल्वेस्थानकातील बेवारस वाहने ताब्यात घेण्याची मागणी वाढू लागली आहे.



नवी मुंबई शहराला पार्किंगच्या समस्येने ग्रासलेले आहे. पार्किंगसाठी जागा अपुरी पडू लागल्याने वाहने रस्त्यांवर उभी केली जात आहे. सर्वाधिक समस्या ही रेल्वे स्थानक परिसरात पाहायला मिळते. त्यात पालिकेचे दुर्लक्षित असलेले भूखंड, उड्डाणपूलांखालील मोकळ्या जागा देखील पार्किंग साठी काबीज केल्या जात आहेत. शहरातील अरुंद रस्ते, दुतर्फा पार्किंगने भरून वाहू लागले आहेत.

याबाबत स्थानिक नागरिक सातत्याने वाहतूक पोलिसांकडे तक्रारी करू लागले असून वाहतूक पोलिसांसाठी ती डोकेदुखी झाली आहे. अशातच आता रेल्वे स्थानकातील पार्किंग स्थानकात वर्षानुवर्षे पडलेल्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रिक्षा, दुचाकी, चारचाकी या व्यतिरिक्त इतरही वाहने रेल्वे स्थानकात पहावयास मिळत आहेत.

बँकांकडून अनेकवेळा कर्ज घेऊन रिक्षा व अन्य वाहने घेतली जातात, मात्र कर्जाचे हप्ते थकवल्यावर संबंधित संस्था ते वाहन जप्त करते, मात्र अशी संस्थांकडे जागा नसल्याने खुशाल सार्वजनिक जागेत वाहने उभी केली जात आहेत. मुख्य म्हणजे, बँकांनीही वाहने जप्त केल्यावर त्यांची स्वतः व्यवस्था करणे गरजेचे आहे, मात्र असे असताना सार्वजनिक व शासकीय ठिकाणी ही वाहने उभी करण्यात आली आहेत. त्यामुळे बँकांकडून शासकीय जागेचा फुकटात वापर केला जात असल्याचा आरोप होत आहे. नेरूळ पूर्वेकडील सिडको वाहनतळात वाहनेही त्याच ठिकाणी असलेल्या बँकांनी जप्त केलेली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे अशा वाहनावर कारवाई करायची मागणी नागरिक करत आहेत .

रेल्वे स्थानकांतील पार्किंग जागेत वर्षानुवर्ष बेवारस पद्धतीने पडलेल्या वाहनांचा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे रिक्षा, बाईक, या व्यतिरिक्त इतरही वाहने रेल्वे स्थानकात पडून आहेत.

सिडकोने आपल्या वाहनतळाची तपासणी करून या बेवारस वाहनांची तपासणी करण्याची गरज आहे. सिडकोने कंत्राटदारांना हे वाहनतळ चालविण्यास दिलेले आहेत, मात्र या वाहनतळाचा वापर कंत्राटदार आपल्या मर्जीनुसार करत असल्याचे दिसून येत आहे. सिडकोचे दुर्लक्ष हे पोलिसांसाठी मात्र डोकेदुखी ठरत आहे.

> नेरूळ रेल्वेस्थानकातील काही वाहने वर्षानुवर्षे जैसे थे स्थितीत आहेत. याबाबत नवी मुंबई वाहतूक पोलीस, मनपा वा सिडको काहीच कारवाई करित नाही. अशा वाहनांची सिडकोने चौकशी करणे गरजेचे आहे. ही वाहने हटवून जागा मोकळी करणे गरजेचे आहे. अन्यथा या वाहनांचा गुन्हे करण्यासाठी गैर वापर होण्याची शक्यता आहे.
>
> **–विजय घाटे, अध्यक्ष, नेरूळ स्टेशन कॉम्प्लेक्स असोसिएशन**

नवी मुंबईतील सार्वजनिक रस्त्यावरील वाहने हटवण्यासाठी आम्ही नेहमी नवी मुंबई पलिकेशी संपर्क साधतर ती वाहने हटवण्यासाठी कारवाई करत असतो. सिडकोच्या नेरुळ रेल्वे स्थानकामध्ये वर्षानुवर्षे असलेल्या बेवारस वाहनामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे का याची माहिती घेऊन पुढील कारवाई करण्यात येईल.

**–तिरुपती काकडे, पोलीस उपायुक्त, वाहतूक विभाग**

# भिकारी, मद्यपींमुळे प्रवासी, नागरिक त्रस्त

## नेरूळच्या एलपी मार्गावरील स्थिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ येथील एलपी मार्गावर सद्या भिकाऱ्यांनी बस्थान मांडले असून काही मद्यपी दररोज इथं दारू पीत बसवल्याने महिला, प्रवाशी नागरिक हैराण झाले आहेत.

नेरूळ येथील एल पी ठिकाण प्रवाशी नागरिकांचे जक्शन स्थळ आहे. या ठिकाणी असलेल्या बस स्थानकातून दरररोज हजारो नागरिक मुंबई, वाशी आणि ठाणे शहराच्या दिशेने एस टी, बेस्ट आणि नवी मुंबई परिवहन बस मधून प्रवास करीत असतात. तसेच येथून शेअर रिक्षाने देखील प्रवाशी जुईनगर स्थानकात जात असतात. या स्थानकाहून हाकेच्या अंतरावर मनपाचे उद्यान उड्डाणपुल आहे. या उड्डाणपूलाखाली भिकारी, गर्दूल्ले यांचा वावर नेहमीच असतो. तसेच उड्डाणपूलाखाली मद्यपी दारू पीत बसलेले पहावयास मिळते.

एल पी ठिकाणी जवळच असलेल्या वाईन शॉप मधून मद्य विकत घेवून बस स्थानकाच्या शेजारी असलेल्या कठड्यावर बसून सकाळ पासूनच इथं मद्यपी दारू पीत असल्याचे नजरेस पडते.



> नेरूळ येथील एलपी ठिकाणी मनपाचे पथक पाठवून कारवाई करण्याचे आदेश देतो.
>
> **–डॉ. कैलास गायकवाड, उपायुक्त, अतिक्रमण विभाग नवी मुंबई मनपा**

तसेच काही इसम जवळच असलेल्या गार्डन आणि उड्डाणपूला खाली जुगार खेळत असल्याचे निदर्शनास येथे. इथं पीत असलेल्या मद्यपीमध्ये बऱ्याचदा दारू पिऊन भांडण होत असून अनुचित प्रकार इथं होत असल्याचे पहावयास मिळतात. या घटकामुळे इथं मोठ्या प्रमाणात कचरा आणि घाण होत असून परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी असल्याचे पहावयास मिळते. इथं भिकाऱ्यांनी चक्क संसार थाटले असून चुलीवर स्वयंपाक देखील करत असल्याचे दिसून येते आहे.

चुकून एखादी दुर्घटना झाली तर याला जबाबदार कोण असा सवाल विचारला जात आहे. सदर घटकावंर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# पनवेल तालुका पत्रकार मंचच्या सदस्यांना अपघात विमा पॉलिसीचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी जन्मदिनाचे वर्ष अनेक उपक्रमांद्वारे साजरे होत आहे. पनवेल तालुका पत्रकार विकास मंच या सामाजिक उपक्रमात अग्रभागी असणाऱ्या व सक्रिय पत्रकारांच्या नोंदणीकृत संस्थेने लोकनेते सन्माननीय रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी जन्मदिनाच्या निमित्ताने सामाजिक उपक्रमांची घोषणा केली आहे. याचा एक भाग म्हणून मंचातील सदस्यांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते पाच लाख रुपयांच्या अपघात विमा संरक्षण पॉलिसीचे वाटप सोमवारी (दि. १०) करण्यात आले.

या वेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले. अपघात विमा पॉलिसी वाटप करत असतानाच आगामी महिन्याभरात अमृत महोत्सवी जन्मदिनाच्या औचित्याने दोन सामाजिक उपक्रम साजरे करण्यात येणार आहेत. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अंगी असणारा दातृत्वाचा गुण आगामी पिढ्यांना समजावा या उदात्त भावनेने सन्माननीय रामशेठ ठाकूर... एक अलौकिक दानशूर व्यक्तिमत्व या विषयावर शालेय विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त उपक्रम



आले आहे. तसेच पनवेल उरण तालुक्यामध्ये समाजातील प्रत्येक स्तरातल्या विद्यार्थ्याला शिक्षण घेता यावे या उदात्त हेतूने ते शैक्षणिक क्षेत्रात देत असलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल सन्माननीय रामशेठ ठाकूर... शिक्षणाची गंगा आणणारे शिक्षण महर्षी या विषयावर देखील विद्यार्थ्यांना निबंध लेखन करता येणार आहे. पहिली ते पाचवी, सहावी ते दहावी आणि महाविद्यालयीन गट अशा तीन गटांच्यात ही स्पर्धा घेण्यात येणार आहे.


त्याचबरोबर डिसेंबर महिन्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या अनुषंगाने पनवेल परिसरात पंच्याहत्तर देशी बहुवार्षिक व औषधी वृक्षांची लागवड करण्यात येणार असल्याची घोषणा पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्यावतीने यावेळी करण्यात आली. या वेळी तमाम उपक्रमांबाबत

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

प्रतिक्रिया देत असताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पनवेल तालुका पत्रकार विकास मंच करत असलेल्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली. तसेच हाती घेतलेल्या समाजोपयोगी उपक्रमांकरिता शुभेच्छा दिल्या, व हे सर्व कार्यक्रम निश्चित यशस्वी होतील असा विश्वास त्यांनी दर्शविला.

पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या सदस्यांना ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीच्या अपघात विमा संरक्षण पॉलिसी प्रदान करण्यात आल्या आहेत. पॉलिसी वितरण कार्यक्रमाला ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीचे पनवेल शाखा प्रभारी मिथिलेश चौबे, व्यवसाय सहयोगी राजेंद्र शहा, विमा पारदर्शकता प्रतिनिधी प्रतीक शहा यांची देखील उपस्थिती होती. यावेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे अध्यक्ष मंदार दोंदे, सल्लागार विवेक पाटील, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, खजिनदार संजय कदम, सरचिटणीस हरेश साठे, प्रवीण मोहोकर, दत्ता कुलकर्णी, दीपक घोसाळकर, राजू गाडे आदी मंचाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# मुंबईतील प्रदर्शनात झळकणार के.डी. आर्ट्सच्या विद्यार्थ्यांची चित्रे





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

के.डी. आर्ट्स अकॅडमीचे विद्यार्थी – हृतिक खर्डीकर, उमैमाह बुकवाला, तुषार पाटकर आणि नाथन जॉर्ज – यांची निवड चिल्ड्रन्स आर्ट पेंटिंग एक्झिबिशन २०२५ मध्ये त्यांच्या कलाकृती प्रदर्शित करण्यासाठी झाली आहे.

हा प्रदर्शनी कार्यक्रम बालदिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आला आहे. हा प्रदर्शनी कार्यक्रम नेहरू सेंटर आर्ट गॅलरी, वर्ली, मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. एकूण ४० ते ५० विद्यार्थी या प्रदर्शनमध्ये सहभाग घेत आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन ११ नोव्हेंबर २०२५ रोजी सायं. ५ वाजता होणार असून प्रदर्शन १६ नोव्हेंबरपर्यंत सकाळी ११ ते सायं. ६ वाजेपर्यंत खुले असणार आहे. के.डी. आर्ट्स अकॅडमीतील विद्यार्थ्यांना आर्ट एक्झिबिशन २०२५ साठी शुभेच्छा मिळत आहेत.

# रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी कॉर्नर ते कष्टकरी नगर या रस्त्याची दुरावस्था झाल्याने या रस्त्यावरुन प्रवास करताना नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात यावे, अशी मागणी बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

जुनी पोसरी, ठाकूरवाडी, कष्टकरी नगर,तुराडे व आसपासच्या गावातील नागरिक याच रस्त्यावरुन प्रवास करतात.या रस्त्याची दैयनीय अवस्था झाल्याने शाळकरी विद्यार्थी, कामगारवर्ग यांना नाहक त्रास सहन



करावा लागतो. या रस्त्याचे डांबरीकरण अथवा कॉक्रीटीकरण व्हावे यासाठी बजरंग दलाचे सुभाष कोकणे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याला पत्रव्यवहार करून २९ एप्रिल २०२५ रोजी ठिय्या आंदोलन करणार असे निवेदन दिले होते. या वेळी सार्वजनिक बांधकाम खात्याने आंदोलन मागे घेण्यास सांगितले आणि पाऊस सुरू होण्यापुर्वी काम पुर्ण करून देऊ, असे आश्वासन दिले होते. पावसाळाही संपला तरी रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने बजरंग दल आंदोलनाच्या पावित्र्यात आहे.

दरम्यान, येत्या दहा दिवसांत रसायनी कॉर्नर ते कष्टकरीनगर या रस्त्याचे काम सुरू करुन रस्ता पुर्ण करू, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मिलिंद कदम यांनी दिले आहे.

# कोपरखैरणेत डॉ. नीळकंठ शिवाचार्य महाराजांचा आशिर्वचन कार्यक्रम



**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय लिंगायत महासंघ, मित्रमेळा सामाजिक संस्था आणि स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज धारेश्वर, ता. पाटण, जि. सातारा यांच्या संत प्रवास व आशिर्वचन कार्यक्रमाचे आयोजन ९ नोव्हेंबर २०२५ रोजी चिकणेश्वर मंदिर, सेक्टर ३, कोपरखैरणे येथे करण्यात आले होते.

राष्ट्रसंत डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज धारेश्वर यांनी उपस्थित भक्तांना आशिर्वचनपर संबोधनात सांगितले, देव, देश, धर्म रक्षणासाठी सर्वांनी कटिबद्ध होऊन सदैव कार्यरत राहायला हवे. समाजात काही शक्ती सध्या हिंदू धर्माची ताकत कमी करण्यासाठी षडयंत्र रचत आहेत. त्यांच्या विरोधात सज्जनशक्तीने संघटित होऊन जनजागृतीचे काम करायला हवे. लिंगायत बांधवांनी संत बसवेश्वरांच्या वचनांप्रमाणे आचरण करायला हवे.

कार्यक्रमाचे आयोजक व मित्रमेळा सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शंकर संगपाळ यांनी सांगितले की, राष्ट्रसंत डॉ. निळकंठ शिवाचार्य महाराज धारेश्वर यांच्या संत प्रवासामुळे समाजामध्ये चैतन्यदायी वातावरण आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अशा विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या बांधवांना महाराजांच्या प्रवचनामुळे प्रेरणा मिळाली. भविष्यातदेखील अशा प्रकारे संतांच्या प्रवासाचे आयोजन वेळोवेळी करण्यात येईल.

या कार्यक्रमास अखिल भारतीय लिंगायत महासंघाचे अध्यक्ष निळकंठ बिजलगावकर, स्वामी समर्थ चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अशोक बिराजदार, सिद्धाराम देकाने, आनंद पाटील, दत्ता संगपाळ, शशिकांत निंबाळे, आनंदराव निंबाळे, तमण्णा निंबाळे, प्रभाकर बिराजदार, महातेश बुक्का, पंडित सोडगी, भीमाशंकर अंबलगी, कुमार संगपाळ व कार्यकर्ते उपस्थित होते.



# अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशनची नूतन कार्यकारिणी जाहीर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथे अमॅच्युअर तायक्वांदो असोसिएशन, रायगडची सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या सभेला रायगड जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, पंच आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सभेमध्ये नवनियुक्त कार्यकारिणी जाहीर करुन नवनियुक्त अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या नावांची घोषणा करण्यात आली. तसेच खुली जिल्हास्तरीय तायक्वांदो स्पर्धा २०२५च्या नियोजनही करण्यात आले.

या सभेमध्ये संदीप सुदाम मुंढे यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली, सचिन माळी हे सचिवपदी, रोहित सिनलकर हे खजिनदारपदी, उपाध्यक्षपदी प्रतीक गायकवाड आणि दिनेश पडाया, तसेच सदस्यपदी सौरभ नवले, अमोल माळी, सचिन मोरे, संजय भोईर आणि गणेश राठोड यांची निवड करण्यात आली.

राष्ट्रीय पंच म्हणून प्रथम ठोंबरे, विशाल चव्हाण, अब्दुल यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी रसायनी तील संदिप मुंढे आणि सचिवपदी सचिन माळी यांची निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रसायनीत बजरंग दलाच्या नामफलकांचे अनावरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यवत संघ–आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या नामफलकाचे अनावरण रसायनी परिसरातील सावळे, चांभार्ली, कांबे, हिरानंदानी भोकरपाडा आदी गावांच्या थांब्यांवर संस्थापक अध्यक्ष दिनेश दादा पाटील, कोकण प्रांत अध्यक्ष सचिन खुळे यांच्याहस्ते करण्यात आले.

या वेळी ठिकठीकाणी महिलांनी दिनेश पाटील व सचिन खुळे यांचे औक्षण केले तर शालेय विद्यार्थ्यांनी वंदे मातरम् गीत गावून स्वागत केले. हिंदुरक्षणासाठी, समाजासाठी तसेच धर्मरक्षणासाठी रसायनी परिसरातील गावांनी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे नेतृत्व स्विकारल्याचे समजते. या वेळी वावेघर, चांभार्ली, मोहोपाडा आदी गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास दिनेशदादा पाटील यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करुन श्रीफळ वाढविण्यात आले. यानंतर सावळे, चांभार्ली, कांबे, हिरानंदानी भोकरपाडा आदी



गावांच्या थांब्यांवर नामफलकाचे अनावरण करण्यात आले. या वेळी दिनेशदादा पाटील यांनी हिंदुत्वावर उत्तम मार्गदर्शन केले. या वेळी परिसरातील सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच तसेच सर्वपक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.

यानंतर मोहोपाडा येथील मरिआई मंदिरात कोकण पायी दिंड्यांच्यावतीने दिनेश पाटील यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे मावळ लोकसभा प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे यांच्याहस्ते दिनेश पाटील व सचिन खुळे यांचे शाल, श्रीफळ देवून स्वागत करण्यात आले.

या वेळी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे मावळ लोकसभा प्रसिध्दी प्रमुख राकेश खराडे, उरण विधानसभा अध्यक्ष जनार्दन मालुसरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, तालुका उपाध्यक्ष संदिप तांबोळी, जिल्हा गोरक्षाप्रमुख मलेश गुडसे, रविंद्र ठाकूर, सुभाष कोकणे आदींसह शेकडो बजरंग बांधव, वारकरी सांप्रदाय व ग्रामस्थ उपस्थित होते.

# अवकाळीने 'हापूस'ला फटका

## ■ श्रीवर्धनमध्ये आंबा, भात आणि नाचणी पिकावर संकटाची छाया



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील नैसर्गिक शेती व्यवस्थेवर अवलंबून असलेला श्रीवर्धन तालुका गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पाऊस, वादळी वारे आणि सतत ढगाळ वातावरणामुळे मोठ्या संकटात सापडला आहे. भात व नाचणी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यानंतर आता आंबा उत्पादकांवरही भीषण संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हापूस, पायरी आणि केसर या सर्वच जातींमध्ये मोहोर लांबणीवर पडण्याचे संकेत स्पष्ट दिसत असून आगामी हंगामात उत्पादन घसरण्याची खरी भीती बागायतदारांनी व्यक्त केली आहे.

श्रीवर्धन तालुक्यात १९१० हेक्टरांवर आंब्याची लागवड आहे. यातील जवळपास: ९० टक्के हापूस, १० टक्के पायरी व केसर दरवर्षी सरासरी ४७ हजार टनांहून अधिक उत्पादन तालुक्यातून बाहेर पडते. कोकणाची अर्थव्यवस्था व शेतकऱ्यांची घरची दिवाळी मोठ्या प्रमाणावर हापूसवर अवलंबून असते. मात्र यावर्षीच्या अनियमित वातावरणामुळे हा संपूर्ण चक्रच विस्कळीत होताना दिसत आहे.

आंबा झाडांवर ऑक्टोबर अखेरपासून नोव्हेंबरपर्यंत नैसर्गिकरित्या मोहोर येण्याची प्रक्रिया सुरू होते. परंतु यंदा ढगाळ वातावरण, वादळी वाऱ्यांचे प्राबल्य यामुळे डिसेंबरपर्यंत मोहोराची कोणतीही हालचाल दिसून येत नाही.

या उशिरामुळे पुढील तीन मोठे परिणाम होणार असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत जर मोहोर फेब्रुवारी–मार्चमध्ये आला, तर फळधारणा थेट जूनमध्ये होईल. जून–जुलैमध्ये ढगाळ वातावरण आणि पावसामुळे मावा, थ्रिप्स, हॉपर्स इत्यादी किडींचा प्रादुर्भाव कोळी, भुरटे, बुरशीजन्य रोग यांची शक्यता अत्यंत जास्त. हवामान लहरीपणा कायम राहिला तर हंगामातील एकूण उत्पादन मोठ्या प्रमाणात ढगाळ अवकाळी पावसामुळे भातपीक–नाचणीचे नुकसान झालेला शेतकरी वर्ग अजून सावरलाच नाही; त्यात आता आंबा बागायतदारांचीही 'रातभर झोप' उडाली आहे. बागायतदार म्हणतात हापूस हा आमचा मुख्य आधार वातावरण असेच राहिले तर यंदाचा हंगाम हातची संधी जाईल.

कृषी तज्ज्ञांनी खालील सूचना दिल्या आहेत कि, बागेत पाण्याचा निचरा कायम ठेवणे झाडांच्या फांद्यांमध्ये हवा खेळती राहील याची काळजी प्रूनिंग मर्यादित प्रमाणात करएण्ड. रोगप्रतिकारक फवारणीचे नियोजन जमिनीतील ओल आणि तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी सेंद्रिय मल्चिंग यामुळे मोहोर प्रक्रियेतील पुढील नुकसान टाळता येऊ शकते.

हापूस निर्यात, व्यापारी, वाहतूक, पॅकिंग केंद्रे, मजूर वर्ग – सर्वच क्षेत्रांवर या परिस्थितीचा मोठा परिणाम होईल. उत्पादन कमी झाल्यास बाजारभाव वाढतील, परंतु शेतकऱ्यांच्या परिश्रमाला योग्य मोबदला मिळणे अनिश्चित राहील.

### हंगाम अवघड

अवकाळीने श्रीवर्धन तालुक्यातील कृषी रचनेला मोठी तडे दिली आहेत. नैसर्गिकरित्या येणारा आंबा मोहोर आणि त्यावर आधारित फळधारणा जर आणखी उशिरा झाली, तर हापूस हंगाम २०२६ अवघड होण्याची चिन्हे प्रकर्षाने दिसत आहेत.

# उसरोलीतील शेकाप कार्यकर्ते भाजपत

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद निवडणूकीच्या निमित्ताने उसरोली जि.प.गटात भाजपची ताकद वाढीस जात आहे. भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड.महेश मोहिते व ॲड.आस्वाद पाटील या व्दयीच्या प्रयत्नोन शेकापचे काही मातब्बर कार्यकर्त्यांना भाजपमध्ये दाखल झाले आहे. एकदंरीत भाजप पक्ष उसरोली जि.प.गटात प्रबल होत असून त्यांनी शेकापला दे धक्का हे तंत्र अवलंबले आहे.



अलिबाग येथील भाजप जिल्हा कार्यालयात रविवारी (दि.९) पक्ष प्रवेश कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. या वेळी भाजप सरचिटणी ॲड.महेश मोहिते, उसरोली जि.प. गटाच्या संभाव्य उमेदवार ॲड. मनस्वी मोहिते, पल्लवी तुळपुले, महेंद्र चौलकर, दक्षिण अलिबाग मंडळ अध्यक्ष अशोक वारगे, आदी प्रमुख मान्यवरासह शेकापचे पक्ष प्रवेश कार्यकर्ते शेकापचे बोर्ली ग्रा.प.शेकापचे माजी सरपंच चेतन जावसेन, बोर्ली कार्यकर्ते असिफ कोर्लेकर, देवेंद्र नटे, बारशीव, जितेंद्र भगत बोर्ली, तसेच यापुर्वीच शेकापमधून भाजपमध्ये प्रवेश घेतलेले, चिचंघरचे एम.एम.ठाकूर, ॲड.मोहनिश ठाकूर, यांची प्रमुख उपस्थितीसह भाजप कार्यकर्ते संदिप चिरायू, गणेश कट, शेषनाथ कानुगोजे, महेश मानकर, धर्माजी हिरवे, अनिल नांदगावकर, आदीची उपस्थिती होती.

या वेळी ॲड. आस्वाद पाटील यांनी सरपंच चेतन जावसेन, असिफ कोर्लेकर, देवेंद्र नटे, बारशीव, जितेंद्र भगत बोर्ली, यांचे भाजप पक्षात स्वागत केले. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ॲड महेश मोहिते यांनी म्हटले की, भाजप ही विकासभिमूख विचारसरणी असलेली पक्षसंस्था आहे. ग्रामीण भागातील प्रगतीसाठी आणि सर्वसामान्याच्या हितासाठी काम करणाऱ्यांचे स्वागत भाजप नेहमीच करतो. बोर्ली येथील माजी सरपंच चेतन जावसेन व इतर सहकारी यांचे भाजप पक्ष प्रवेशाने बोर्ली परिसरात भाजपचा पाया अधिक मजबूत होईल, व पक्ष प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्याला बळ दिले जाईल असे म्हटले तर पक्ष प्रवेश घेतलेले माजी सरपंच चेतन जावसेन यांनी म्हटले की, विकास कामाना गती देण्यासाठी आणि लोकापर्यंत सरकारी योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी भाजप सोबत काम करण्याचा निर्णय घेतला असे म्हटले.

उसरोली जि.प. गटात भाजपचे वाढती ताकद निश्चितच विरोधकांना आव्हान ठरणार असून येत्या निवडणूकीत काटे की टक्कर पहावयास मिळेल, मात्र शेकापचे अनेक मातब्बर मंडळी पक्ष सोडून जात असल्याने शेकापचे नेतेमंडळीना निश्चितच आत्मचिंतनाची गरज भासते.

# पालीत रंगणार राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

## प्रतिभावंत व्यक्तिमत्वांचा होणार सन्मान

**पाली : प्रतिनिधी**

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानच्या वतीने पालीत १८ डिसेंबर पासून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा रंगणार आहेत. या स्पर्धा १३ वर्षांपासून अविरत पणे सुरू आहेत. येथील ग.बा. वडेर हायस्कुल पालीच्या भव्य रंगमंचावर या स्पर्धा होणार आहेत. जनता या स्पर्धेवर प्रेम करते. जनतेला या एकांकिका स्पर्धेची ओढ लागलेली असते. त्यामुळे या स्पर्धेचे सात दिवस जणू पालीत भव्य महोत्सव व जल्लोष असल्याचे प्रफुल्लित वातावरण पहावयास मिळते.

स्पर्धेच्या उद्घाटनास सिने अभिनेते व विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर या स्पर्धेचा समारोप व बक्षिस समारंभ २४ डिसेंबरला होणार आहे. समारोपावेळी नाट्यरसिकांना पाहण्यासाठी एक दर्जेदार नाटक मोफत असणार आहे. प्रसिद्ध समाजसेवक व नामवंत उद्योजक, प्रकाशभाऊ देसाई यांच्या वाढदिवसानिमित्त मागील अनेक वर्षांपासून राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा यशस्वीपणे होत आहेत.

या स्पर्धेत मुंबई, ठाणे, पुणे, कोकण, इत्यादींसह राज्यातील तसेच गोवा आणि इतर राज्यातील एकांकिका संघ व स्पर्धक देखील सहभागी होतात. एकांकिका स्पर्धेत सांघिक प्रथम क्रमांक पटकाविणार्या एकांकिका संघाला एक लाख रुपये व आकर्षक चषक, द्वीतीय



क्रमांकास ७५ हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांकास ५० हजार रुपये व आकर्षक चषक, चतुर्थ किंवा लक्षवेधी क्रमांकास २५ हजार रुपये व आकर्षक चषक देवून गौरविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या एकांकिका संघाला स्वतंत्रपणे १५ हजार रुपये व आकर्षक चषक देवून गौरविण्यात येणार आहे. तसेच वैयक्तीक अभिनयाकरीतादेखील प्रोत्साहनपर पारितोषिक दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी वेत्रवान गुरव (९०२८५९२०९०), अभिजित चांदोरकर (८९८३७१३७६९), शरद निकुंभ (८४०८९३०३६५) यांच्याशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले.

या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष वेत्रवान गुरव, उपाध्यक्ष अभिजित चांदोरकर, सचिव शरद निकुंभ, सदस्य सचिन मोरे, विक्रम काटकर, सुहास लोखंडे, शेखर राऊत, सुशील शिंदे, आशिष हजारे, ऋषिकेश पिंपळे, मिलिंद सातूर्डेकर, दत्ता सावंत आदींसह पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई देण्याची मागणी

## माणगाव तालुका शेतकरी संघटनेची तहसील कार्यालयावर धडक

**माणगाव : प्रतिनिधी**

ओला दुष्काळ जाहीर करा, पीककर्ज माफ करा, सरसकट शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्या, अशी मागणी करीत माणगावात तालुका शेतकरी संघटनेतर्फे तहसील कार्यालयावर सोमवारी (दि.१०) विराट मोर्चाचे आयोजन संघटनेचे तालुकाध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या नेतृत्वाखाली व शेतकऱ्यांचे नेते अनिल नवगणे, भागोजीबुवा डवले व संघटनेचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते.





या मोर्चात मोर्चेकरांनी हा आम्ही शांततेच्या मार्गाने काढलेला मोर्चा असून यापुढे आमच्या मागण्या मान्य न झाल्यास रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे. शेतकरी संघटनेतर्फे शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन माणगाव तालुक्याचे निवासी नायब तहसीलदार विपुल ढुमे यांना देण्यात आले. या वेळी मोर्चेकरांना आश्वासित करताना निवासी नायब तहसीलदार विपुल ढुमे यांनी आपल्या भावना आम्ही ऐकल्या असून त्या भावना शासनापर्यंत पोहचवून त्यातून सकारात्मक यश मिळेल, असे सांगितले.

अवकाळी पावसामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या भात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. भारताच्या इतिहासात पहिल्यादांच शेतकऱ्यांनी भाताची पेरणी केल्यापासून अगदी लावणी – कापणी पर्यंत सातत्याने मुसळधार पाऊस पडत आहे. अगदी थंडीचे दिवस आले असतानाही अवकाळी मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे कोकणातील शेतकरी बेहाल झाला आहे. याकडे लक्ष देऊन माणगाव तालुका शेतकरी संघटनेने सोमवारी माणगाव तहसील कार्यालयावर विराट मोर्चा काढला. या मोर्चात मार्गदर्शन करताना माणगाव तालुका शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांची शेती एकरीत आहे. तर कोकणात शेतकऱ्यांची शेती गुंठ्यात आहे.

भातशेती म्हणजे गरीब शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. गरीब शेतकरी काबाड कष्ट करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवीत असतो. त्यामध्ये या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावर आसमानी संकट कोसळले आहे. अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला भात शेतातच आडवा झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी भात कापणी करून रचून ठेवलेल्या मळण्या भिजल्या आहेत. एकंदरीत शेतकऱ्यांचे हे भात पूर्णतः नष्ट झाले असून गरीब शेतकऱ्यांच्या डोळ्यांतून अश्रू येत आहेत.

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे या नुकसानग्रस्त गरीब शेतकऱ्यांना शासनाकडून एकरी पन्नास हजार रूपये तात्काळ मदत मिळाली पाहिजे अशी आपली मागणी असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांचे नेते अनिल नवगणे यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना आज आपण शांततेच्या मार्गाने मोर्चा काढला यापुढे शेतकऱ्यांच्या मागण्या सरकारने मान्य न केल्यास रास्ता रोको आंदोलन करू असा इशारा दिला.

संघटनेचे सचिव अशोक पाटील यांनी यावेळी मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांनी आपल्यावर कोसळले संकट पाहता संघटित होणे काळाची गरज असल्याचे सांगितले. या वेळी भागोजीबुवा डवले व प्रगतशील शेतकरी रामदास जाधव यांनीही मार्गदर्शन करून सरकारने शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली.

या मोर्चाला संघटनेचे सरपंच कदम, अशोक पाटील, सखाराम जाधव, वडेकर गुरुजी, नितीन वाघमारे, नितीन दसवते, सुभाष गुगळे, दिनेश गुगळे, सीताराम भोनकर, नामदेव शिंद, संदेश गुगळे, योगेश गुगळे, विलास गोठलं, बाळा मांजरे, प्रवीण बागवे, सुधाकर पालकर, अंजली पवार, विश्वंभर दांडेकर, सचिन सत्वे, कैलास पोवार, काशीराम पोवार, बाबू पाखुर्डे, चंद्रकांत सत्वे, नंदू वाढवळ आदी उपस्थित होते.

# धारिया दाम्पत्याचा खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते गौरव

**पाली : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते विजय परशुराम धारिया यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्याचा आणि त्यांच्या पत्नी संगीता विजय धारिया यांच्या अमृत महोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि स्नेहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या वेळी खासदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते उभयतांचा गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाला खासदार धैर्यशील पाटील, भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश तुळपुळे, नरेंद्र जाधव, अरविंद मेहता, सुभाष मेहता, अशोक मेहता, नगराध्यक्ष पराग मेहता तालुक्यातील भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व तसेच अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. या वेळी मुले, सुना व नातवंडांच्या हस्ते आई वडिलांची गुळाची तुला करण्यात आली.

विजय धारिया यांनी भारतीय जनता पक्षाच्या प्रारंभीच्या कठीण काळात सुधागड तालुक्यात पक्ष संघटनेची मुळे रुजविण्याचे आणि कार्यकर्त्यांना जोडून ठेवण्याचे काम सातत्याने केले. पक्षवाढीसाठी त्यांनी घेतलेला परिश्रम आणि जनतेशी जुळवून घेतलेले नाते यामुळेच आज कमळ फुलले आहे, अशा शब्दात खासदार धैर्यशील पाटील यांनी विजय धारिया यांचा गौरव केला.

एका बाजूला सहस्रचंद्र दर्शनाचा सन्मान आणि दुसऱ्या बाजूला अमृत महोत्सव असा दुग्धशर्करा योग लाभल्याने या सोहळ्याचे औचित्य अधिक वाढले. या वेळी कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार यांनी पुष्पगुच्छ, स्मृतिचिन्ह देऊन धारिया दांपत्यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती धारिया यांनी तर आभार राजेंद्र मेहता यांनी मानले.

# चांदोरे येथील खडतर बंधूंनी घेतले नऊ एकरात कलिंगडाचे ८० टन उत्पादन

**माणगाव : बातमीदार**

धो–धो पावसाच्या सरींमध्ये माणगाव तालुक्यातील दोन तरुण शेतकऱ्यांनी नव्या प्रयोगाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. चांदोरे येथून पांडुरंग खडतर आणि रूपेश खडतर या बंधूंनी उन्हाळ्याच्या पिकाची ओळख असलेले कलिंगड सिझनच्या आधीच बाजारात आणत शेतकऱ्यांसाठी नवा आदर्श निर्माण केला आहे.

गणपतीच्या दरम्यान 'शिबा' जातीच्या कलिंगडाची लागवड



करून त्यांनी तब्बल नऊ एकर क्षेत्रात उत्पादन घेतले. आतापर्यंत त्यांनी जवळपास ८० टन कलिंगड वाशीच्या बाजारात विकले असून, हंगामाआधीच आलेल्या या उत्पादनाला भाव दुप्पटीने मिळत आहेत. त्यांच्या या धाडसी प्रयोगाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

भातशेतीवर पावसाचा प्रचंड परिणाम होत असल्याने आम्ही जोडधंदा म्हणून कलिंगड शेतीचा प्रयोग केला. त्यातून काही मजुरांनाही रोजगार मिळाला, हे आमच्यासाठी समाधानकारक आहे. तरुण पिढीनेही शेतीकडे वळून नवे प्रयोग केले, तर त्याचा निश्चित फायदा होईल. असे खडतर बंधू यांनी सांगितले. यांच्या या नव्या विचारांच्या शेतीमुळे रायगड जिल्ह्यातील तरुण शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे नवे पर्व सुरू झाले आहे.

# कुंभे जलविद्युत प्रकल्प पूर्णत्वाची प्रतीक्षा

## विस्थापितांच्या समस्याही सोडवण्याची गरज

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका हा सह्याद्रीच्या कुशीत वसलेला हिरवाईचा पट्टा. इथले डोंगर, नद्या आणि दर्या यांच्यातून वाहणारे झरे हे केवळ निसर्गाचे वैभव नाही, तर हजारो शेतकऱ्यांच्या जीवन रेषाही आहेत. या परिसरात ऊर्जा निर्मिती, सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून सुमारे २००२मध्ये म्हणजे दोन दशकांपूर्वी कुंभे जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा धाडसी निर्णय शासनाने घेतला. २००७ मध्ये हा प्रकल्प रडत खडत सुरू झाला. त्यावर ३८५ कोटी मंजूर असताना फक्त २०० कोटीच खर्च करण्यात आले. परंतु आज, २०२५ मध्ये उभे राहून पाहिले, तर हा प्रकल्प एक अपूर्ण स्वप्न ठरल्याचे कटू वास्तव दिसते.



काळ–कुंभे संयुक्त जलप्रकल्प या नावाने हा प्रकल्प आखण्यात आला होता. सह्याद्रीच्या उतारांवरून झेपावणाऱ्या पाण्याचा उपयोग करून सुमारे २५ मेगावॅट वीज निर्मिती करण्याचा आराखडा तयार झाला. यातील कुंभे घटकाचा वाटा १० मेगावॅटचा आहे. यामुळे स्थानिक वीजपुरवठा सक्षम होईल, सिंचनासाठी पाण्याचा वापर वाढेल आणि महाड–माणगाव या शेतीप्रधान तालुक्यांना नवा श्वास मिळेल, अशी गोड स्वप्ने शेतकऱ्यांनी पाहिली होती. शासनाच्याही योजनांमध्ये या प्रकल्पातून मिळणाऱ्या पाण्याचा उपयोग पिण्याच्या पाण्याच्या योजनेसाठी आणि औद्योगिक विकासासाठी करण्याचा विचार होता.

धरण उभारणीच्या प्रक्रियेत कुंभे गावासह काही आसपासची वस्ती पाण्याखाली जाणार असल्याचे स्पष्ट झाले. कुंभे या गावाच्या भागातील सुमारे ११८ कुटुंबांना माणगाव शहरातील भादाव गावापासून दूरवर पुनर्वसनासाठी जागा देण्यात आली, तर अनेक कुटुंबांना अद्यापही संपूर्ण नुकसानभरपाई मिळालेली नाही. काहींना घरांचे प्लॉट मिळाले, पण नव्याने उभारलेली वस्ती पाण्याशिवाय, रस्त्याशिवाय आणि रोजगाराशिवाय आहे, अशी परिस्थिती स्थानिकांनी वारंवार मांडली आहे. शासनाने आमचे आयुष्य उजाड केले, पण वीज मात्र कुणाच्या घरात जाते हेच माहित नाही, असा सवाल अनेक प्रकल्पग्रस्त आजही विचारताना दिसतात.

अलीकडील शासकीय प्रस्तावांमध्ये या भागात पंप–स्टोरेज जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा विचार सुरू आहे, ज्याची क्षमता तब्बल ११०० मेगावॅट असू शकते. हे निश्चितच तांत्रिक प्रगतीचे पाऊल असले, तरी यासाठी पुन्हा मोठ्या प्रमाणात जमीन, वनक्षेत्र आणि लोकांचे विस्थापन अपेक्षित आहे. मध्यंतरी या प्रकल्पाला ६०० कोटी देण्याची घोषणा केली होती, याबाबतीत खासदार सुनील तटकरे हे प्रयत्न करत हे धरण पूर्ण करण्यासाठी निश्चितच प्रयत्न करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### चित्र बदलण्याची आशा

कुंभे प्रकल्पातून हे चित्र बदलण्याची आशा होती. धरणाचा जलसाठा योग्य पद्धतीने वितरित झाला असता, तर माणगाव आणि महाड तालुक्यातील हजारो एकर जमीन ओलीताखाली आली असती, परंतु प्रकल्प अपूर्ण राहिल्याने शेतकऱ्यांना अजूनही पावसावरच अवलंबून राहावे लागते. काही शेतकऱ्यांनी या पाण्याचा उपयोग भविष्यात ड्रिप सिंचन आणि एकात्मिक शेतीसाठी होईल अशी आशा व्यक्त केली असली, तरी सरकारने तो मार्ग अद्याप खुला केलेला नाही.

### शेतकऱ्यांना मिळणारा फायदा महत्त्वाचा

कुंभे जलविद्युत प्रकल्प हा केवळ विजेचा विषय नाही; तो स्थानिक लोकांच्या स्वप्नांचा, संघर्षाचा आणि शासनाच्या जबाबदारीचा आरसा आहे. कोकणातील पावसाचे पाणी समुद्रात जाण्याआधी योग्य व्यवस्थापन करून त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा, हा प्रकल्पाचा मूळ हेतू होता. प्रकल्पग्रस्तांना संपूर्ण नुकसानभरपाई, रोजगाराची हमी आणि गावांच्या पुनर्वसनाची स्पष्ट योजना दिल्याशिवाय हा विकास खरा ठरणार नाही.

# टी-२० वर्ल्डकपचे संघ ठरले!

## इटली पहिल्यांदाच खेळणार प्रतिष्ठेची स्पर्धा




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धा सुरू होण्याची संभाव्य तारीख समोर आली आहे. भारत आणि श्रीलंका यांच्या यजमानपदाखाली होणारा टी-२० विश्वचषक ७ फेब्रुवारीला होण्याची शक्यता आहे. या स्पर्धेसाठी जगभरातील २० संघ पात्र ठरले आहेत. यातील इटली हा संघ पहिल्यांदाच ही विश्वचषक स्पर्धा खेळणार आहे.

आगामी टी-२० विश्वचषक स्पर्धा आयपीएल २०२६च्या आधी खेळवली जाणार आहे. भारतात पाच ठिकाणी हे सामने खेळवले जातील, तर श्रीलंकेत कोणत्या तरी एकाच ठिकाणी सामने होणार असून अद्याप ठिकाण निश्चित झालेले नाही. आयसीसी लवकरच स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर करणार आहे.

या टी-२० विश्वचषकात एकूण २० संघ सहभागी होतील. भारत आणि श्रीलंका हे संघ यजमान म्हणून स्पर्धेसाठी थेट पात्र ठरले आहेत. २०२४च्या टी-२० विश्वचषकातील अव्वल सात संघांनाही थेट पात्रता मिळाली आहे, ज्यात अफगाणिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, अमेरिका आणि वेस्ट इंडिज यांचा समावेश आहे. याशिवाय न्यूझीलंड, पाकिस्तान आणि आयर्लंड यांनी त्यांच्या टी-२० क्रमवारीच्या आधारे पात्रता मिळाली.

कॅनडा व अमेरिका संघ पात्रता फेरीतून पात्र ठरले, तर इटली नेदरलँड्स, नामिबिया आणि झिम्बाब्वे यांनी आपापल्या प्रदेशातून वर्ल्डकप खेळण्याची पात्रता मिळवली. आशिया ईएपी पात्रता फेरीतील अखेरच्या सामन्यात संयुक्त अरब अमिराती (यूएई) टी-२० विश्वचषकासाठी पात्र ठरणारा २०वा आणि शेवटचा संघ ठरला. ओमानमध्ये झालेल्या आशिया-पूर्व आशिया-पॅसिफिक पात्रता स्पर्धेत अव्वल तीनमध्ये स्थान मिळवून युएईने विश्वचषकासाठी पात्रता मिळवली. यापूर्वी नेपाळ व ओमान हे संघ स्पर्धेसाठी पात्र ठरले. इटलीचा संघ विश्वचषक स्पर्धा पहिल्यांदाच खेळणार आहे.

**असे असेल स्पर्धेचे स्वरूप**

स्पर्धेचे स्वरूप २०२४च्या टी-२० विश्वचषकाप्रमाणेच असेल. २० संघांना चार गटांमध्ये विभागले जाईल. प्रत्येक गटात पाच संघ असतील. हे संघ त्यांच्या गटातील इतर चार संघांशी एकदा खेळेल. गटातील अव्वल दोन संघ सुपर ८ फेरीत प्रवेश करतील. जिथून चार सर्वोत्तम संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील आणि त्यानंतर दोन अव्वल संघ जेतेपदासाठी लढतील.

## आमदार प्रवीण दरेकर बॉक्सिंग संघटना अध्यक्षपदी

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनच्या निवडणुकीत



कवळी-दरेकर पॅनलने सर्वच्या सर्व २७ जागांवर निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. त्यामुळे राज्य बॉक्सिंग असोसिएशनच्या अध्यक्षपदी आमदार प्रवीण दरेकर हे निवडून आले आहेत.

आमदार प्रवीण दरेकर यांना सर्वच्या सर्व ४३ मते मिळाली, तर विरोधी पॅनेलच्या रणजित सावरकर यांना एकही मत मिळाले नाही. मतदार प्रतिनिधींनी दाखवलेला विश्वास सार्थ करू व राज्यात बॉक्सिंगला पुन्हा वैभवाचे दिवस आणू, अशी प्रतिक्रिया आमदार दरेकर यांनी दिली. दरम्यान, विजयानंतर आमदार दरेकर व सहकाऱ्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनी सर्वांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## महात्मा फुले कॉलेजचा ॲथलेटिक्स स्पर्धेत पदकांचा 'षटकार'



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या मरीन लाइन्स येथील युनिव्हर्सिटी स्पोर्ट्स पॅव्हेलियन या ठिकाणी नुकत्याच झालेल्या मुंबई सिटी झोन, मुंबई सब अर्बन झोन आणि ठाणे झोन ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप २०२५-२६ या स्पर्धेत पनवेलमधील महात्मा फुले महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत एकूण सहा पदकांची कमाई केली आहे.

स्पर्धेत सेजल नामदेव पाटील हिने थाळीफेकमध्ये सुवर्ण, शिवकन्या ताटेने पाच हजार मी. धावणे शर्यतीत रौप्य व १५०० मी. धावणे कांस्य, राज कमळ्या भगतने पाच हजार मी. धावणे व १० हजार मी. धावणे शर्यतीत कांस्य, तसेच साहिल साळुंके, सत्यम ठाकूर, राज भगत व यश पाटील यांनी ४ बाय ४०० मी. रिले शर्यतीत कांस्यपदक पटकाविले. या खेळाडूंना प्रशिक्षक अक्षय जितेकर यांनी प्रशिक्षण दिले.

या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर तसेच शिवछत्रपती पुरस्कार विजेते सूर्यकांत ठाकूर व संजय कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य राजाराम पाटील, डॉ. लक्ष्मण गवळी, प्राध्यापकवृंद व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी पदकविजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचे रग्बी स्पर्धेत यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाने जिल्हास्तरीय रग्बी स्पर्धेत १९ वर्षाखालील गटामध्ये व्दितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात सहभाग घेतलेल्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या संघात आषु होरील साह, नटवर भगवान झा, समर्थ महेंद्र म्हात्रे, रूद्र सुनील पाटील, प्रित विलास भोईर, आदित्य अशोक राणे, सुजल संजय शिंदे, विघ्नेश संतोष पानसरे, चिंतन अनिल मोरे, ओंकार दत्तात्रेय पाटील, वैभव कुमार मोरे, पृथ्वीराज संजय जाधव या विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि संभाजी जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळ संचालक संजय भगत, सचिव डॉ.एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी, प्राचार्य निशा नायर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## खो-खोमध्ये कोपरखैरणे कॉलेज, रबाळे विद्यालय विजेते



**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील ज्ञान विकास ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षाखालील मुलींच्या संघाने मुंबई विभागीय खो-खो स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. त्यामुळे हा संघ राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.

या संघावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी हा संघ मुंबईचे प्रतिनिधित्व करणार आहे. राज्यातही संघ अव्वल यावा अशा शुभेच्छा मुख्याध्यापक, शिक्षकांनी दिल्या.

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका संचलित पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय रबाळेमधील १७ वर्षाखालील मुलांच्या खो-खो संघाने विभागीय स्तरावर सलग दुसऱ्या वर्षी विजेतेपद प्राप्त केले आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाला आहे.



रबाळे संघातील अष्टपैलू खेळाडू आशिष गौतम, ओंकार सावंत, करण गुप्ता, आशिष रत्नाकर, गणेश गायकवाड यांनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन करून वसई विरार मनपा, ठाणे ग्रामीण व मुंबई उपनगर संघाचा मोठ्या गुणांच्या फरकाने पराभव करत विभागीय स्तरावर विजेतेपद पटकावले.

विजेत्या खेळाडूंना प्रशिक्षक प्रताप शेलार, मनोज पवार, स्वप्नील पाटील, अभिषेक परब तसेच शाळेचे क्रीडा शिक्षक प्रा. अमोलकुमार वाघमारे, कमलेश इंगळे, दिनेश भोये, योगेश राज यांचे मार्गदर्शन लाभले. पुढील राज्यस्तरीय स्पर्धा १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान अहिल्यानगर येथे होणार आहे.

रबाळे संघाचे माजी महापौर सुधाकर सोनवणे, रंजना सोनवणे, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, स्नेहल विशे, केंद्र समन्वयक अविनाश जाधव, रमेश तेली यांनी अभिनंदन केले व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## 'आरडीसीए'च्या १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) च्या वतीने आयोजित १९ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेला जिल्ह्यातील विविध भागातील क्रिकेट मैदानावर सुरुवात करण्यात आली. घरत क्रिकेट मैदान खारघर येथे आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

एसबीसी महाड विरुद्ध चॅम्पियन्स क्रिकेट अकॅडमी खारघर या दोन संघांमध्ये उद्घाटनीय सामना खेळविण्यात आला तसेच जिल्ह्यातील बी.पी. पाटील क्रिकेट मैदान व घरत क्रिकेट मैदान खारघर, फोर्टी प्लस गावदेवी क्रिकेट मैदान टेंभोटे पनवेल, छत्रपती शिवाजी महाराज मैदान उलवे, छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट क्रीडांगण पेण अशा जिल्ह्यातील विविध मैदानांवर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नामवंत क्रिकेट अकॅडमी, क्लब संघानी स्पर्धेत सहभाग घेतला आहे.

स्पर्धा प्रथम साखळी व नंतर बाद फेरी अशी होणार असून स्पर्धेतील खेळाडूंनी केलेल्या कामगिरीवर आरडीसीएचा संघ निवडला जाणार आहे. निवड झालेला संघ पुढे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित आंतरजिल्हा निमंत्रित क्रिकेट स्पर्धेत सहभागी होईल. आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

## 'एमएनएम'च्या डॉजबॉलपटूंचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील मोरू नारायण म्हात्रे (एनएनएम) विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय डॉजबॉल स्पर्धेसाठी १९ वर्षाखालील मुलांच्या गटात निवड झाली आहे. त्याचप्रमाणे इतर मुला-मुलींनीही विभागीय स्पर्धेत यश प्राप्त केले आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या सर्वांना मेडल व चषक देऊन गौरविण्यात आले.

यामध्ये आर्यन गोंधळी, आर्यन रामदास नाईक, ओमकार भरत पाटील, प्रयास कोळी व श्रेयस दुधाने यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे. त्याचप्रमाणे विभागीय स्तरावरील डॉजबॉल स्पर्धेतील १९ वयोगटातील मुलांनी उपविजेतेपद, १७ वयोगटाखालील मुले व मुलींनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी राज्यस्तरीय निवडीबद्दल आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या खेळातील प्राविण्याबद्दल समाधान व्यक्त करत उत्तरोत्तर प्रगतीमध्ये सातत्य राखावे, असे सांगितले.

या कौतुक समारंभास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, न्हावा माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, हरिश्चंद्र भोईर, अनंताशेठ ठाकूर, वसंतशेठ पाटील, मीनाक्षी पाटील, कमलाकर देशमुख, रघुनाथ देशमुख, सुधीर ठाकूर, योगिता भगत, सुहास भगत, विश्वनाथ कोळी, निलेश खारकर, श्रीकांत घरत, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, छत्रपती शिवाजी विद्यालय मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलास लेंबे, आर.एस. भोईर, डी.के. म्हात्रे, पर्यवेक्षिक प्रणिता गोळे, अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करत अभिनंदन केले व पुढील वाटचाल शुभेच्छा दिल्या. स्पर्धेकरिता क्रीडा शिक्षक वामन कुऱ्हाडे व वर्षा नलावडे यांनी परिश्रम घेतले.

## युवराज सिंगने सांगितले अभिषेक शर्माचे सिक्रेट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या टी-२० संघाचा सलामीवीर अभिषेक शर्मा तुफान फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध टी-२० मालिकेत त्याने सर्वात कमी चेंडूत एक हजार धावा पूर्ण करण्याचा वर्ल्डरेकॉर्ड केला आहे. याचबरोबर त्याने मालिकेत सर्वाधिक १६३ धावा केल्या. यानंतर युवराज सिंग व अभिषेकचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे.

अभिषेक शर्माने भारताचा माजी खेळाडू युवराज सिंगकडे क्रिकेटचे धडे गिरवले आहेत. युवराजने त्याला ट्रेनिंग देत आंतरराष्ट्रीय क्रिकेटसाठी तयार केले. आता युवीने अभिषेकबाबत एक मोठा खुलासा केला आहे. तो म्हणाला की, अभिषेककडून कोणीही काहीही घेऊ शकतो, पण बॅट मात्र कोणीच घेऊ शकत नाही. अभिषेक त्याच्या बॅटची खूप काळजी घेतो आणि सतत त्याच्याकडे किती बॅट आहेत हे मोजत असतो.

युवराज आणि अभिषेक यांच्या एकत्र मुलाखतीचा एक व्हीडिओ सध्या व्हायरल होत आहे. युवराज या मुलाखतीमध्ये म्हणतोय, तुम्ही अभिषेककडून काहीही घेऊ शकता, पण त्याच्याकडून त्याची बॅट कोणीच घेऊ शकणार नाही. तो एखाद वेळेस लढेल, मार खाईल, रडेल, पण आपली बॅट देणार नाही. त्याच्याकडे दहा बॅट असतील तरी तो म्हणेल, माझ्याकडे फक्त दोनच बॅट आहेत. दोन किटबॅगमध्ये असतात, तर चार घरी असतात. तो माझ्या बऱ्याच बॅट घेऊन गेला, मी कधी त्याला नको म्हटले नाही, पण स्वतःची बॅट तो कधीच देत नाही.

अभिषेक शर्मा आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखला जातो. सध्याच्या घडीला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील तो जगातील पहिल्या क्रमांकाचा फलंदाज आहे. आयसीसी क्रमवारीत पहिल्या स्थानावर असलेला अभिषेक प्रत्येक मालिकेत चांगली कामगिरी करत आपले स्थान अधिक पक्के करत आहे.

## पॅरा बॅडमिंटनमध्ये भारताचे वर्चस्व

**प्रमोद भगतची गोल्डन हॅट्ट्रिक, कृष्णा, सुकांतलाही पदके**

**शिझुओका : वृत्तसंस्था**

भारताचे पॅरा बॅडमिंटनपटू प्रमोद भगत, कृष्णा नागर आणि सुकांत कदम यांनी जपान पॅरा बॅडमिंटन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत पदकांची लयलूट केली आहे. प्रमोदने एकेरी, दुहेरी आणि मिश्र दुहेरी या तीनही प्रकारांत सुवर्णपदके जिंकून 'गोल्डन हॅट्ट्रिक' केली, तर टोकियो पॅरा ऑलिम्पिक विजेता कृष्णाने एकेरी आणि मिश्र दुहेरी अशी दोन सुवर्णपदके पटकावली. याशिवाय सुकांत कदमने पुरुष दुहेरीत सुवर्ण आणि एकेरीत रौप्यपदक जिंकले.

एसएल ३ गटात प्रमोद भगत सर्वात प्रभावी खेळाडू ठरला. त्याने पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात जपानच्या डाईसुके फुजिहाराविरुद्ध पहिला गेम १७-२१ने गमावल्यानंतर शानदार पुनरागमन केले. एक तास ३३ मिनिटे चाललेला हा सामना भगतने १७-२१, २१-१९, २१-१० अशा फरकाने जिंकला. पुरुष दुहेरीत प्रमोद आणि सुकांत कदम या जोडीने भारतीय खेळाडू जगदीश दिल्ली आणि नवीन शिवकुमार यांचा २१-१७, १८-२१, २१-१६ असा पराभव केला. यानंतर मनीषा रामदाससोबत खेळताना मिश्र दुहेरीचे विजेतेपद पटकावत त्याने सुवर्णपदकांची हॅट्ट्रिक पूर्ण केली. दुसरीकडे कृष्णा नागरने पुन्हा एकदा आपला उत्कृष्ट दर्जा सिद्ध करत एसएच६ पुरुष एकेरी आणि मिश्र दुहेरीची विजेतेपदे जिंकली.

## कबड्डीत पुणे ग्रामीण, परभणी संघ विजेते

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे ग्रामीणने किशोर आणि परभणी संघाने किशोरी गटात ३६व्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत विजेतेपद मिळविले. परभणीचे जेतेपदाचे सलग दुसरे वर्ष आहे.

पिंपरी चिंचवडच्या बापखेल येथील श्रीरंग धोदाडे क्रीडानगरीत राकेशभाऊ घुले कबड्डी संघ व युवा प्रतिष्ठान तसेच महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या विद्यमाने आयोजित किशोरी गटाच्या अंतिम सामन्यात पुणे ग्रामीण संघाने अहिल्यानगरचा ३९-२० असा लीलया पराभव करीत स्व. राजश्री चंदन पांडे चषकाबरोबरच आमदार चषकावर पहिल्यांदा आपले नाव कोरले. आक्रमक सुरुवात करणाऱ्या पुण्याने पहिला लोन देत पूर्वार्धात १९-१० अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आपल्या खेळातील जोश कायम राखत दुसरा लोण दिला. मानसी गावडे, धुविता माने यांच्या धारदार चढायांना सई जाधवची मिळालेली पकडीची साथ यामुळे हा विजय सोपा गेला. मुंबई शहर पश्चिम, नाशिक ग्रामीण या बलाढ्य संघाना पराभूत करणाऱ्या अहिल्यानगरला अंतिम सामन्यात मात्र ही किमया साधता आली नाही. त्यांच्या ज्ञानेश्वरी ढवण, फौजिया शेख, श्रेया अडसुळ यांचा खेळ या सामन्यात बहरला नाही.

### किशोर किशोरी गट निवड चाचणी

किशोर गटाच्या अंतिम सामन्यात गतविजेत्या परभणीने पालघरला ४२-३० असे नमवत स्व. प्रभाकर नागो पाटील चषकाबरोबर आमदार चषकावर आपले नाव कोरले. पहिल्या डावात दोन्ही संघानी एकमेकाचा अंदाज घेत खेळ केल्याने विश्रांतीला गुणफलक १५-१४ असा परभणीकडे झुकला होता. दुसऱ्या डावात मात्र जोरदार मुसंडी मारत परभणीने दोन लोन देत सलग दुसऱ्यांदा विजेतेपदावर आपले नाव कोरले. राहुल चव्हाण, विजय तारे यांच्या चौफेर चढाया त्यांना दिपराज कांबळे, सुनीलकुमार कांबळे यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे हा विजय शक्य झाला. पालघरच्या विनीत पाचलकर, ध्रुव डोंगरे, निशांत बाईत यांचा पहिल्या डावातील जोश दुसऱ्या डावात दिसला नाही.

स्पर्धेचे बक्षीस वितरण विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे व राज्य कबड्डी संघटनेचे सचिव बाबूराव चांदेरे यांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी अर्जुन पुरस्कार शकुंतला खटावकर, राष्ट्रीय ज्येष्ठ खेळाडू वासंती सातव-बोर्डे, छत्रपती पुरस्कार प्राप्त राजू घुले, शोभा भगत, संगीता सोनावणे, नितीन घुले उपस्थित होते.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com